शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्यंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक एप्रिल २०२१
अंक क्र. ४६
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 103 कोल्हापूर सोमवार ता. 12 एप्रिल 2021 किंमत 2 रुपये ✲ पाने 4+4 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## भिडे कुलातील बंधू, भगिनी आणि माहेरवाशीणींना नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व आरोग्यदायी जावो !

# लेखन स्पर्धा २०२०-२१

गेली दोन वर्षे लेखन स्पर्धा घेत आहोत आणि त्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. ह्या वर्षी पुन्हा आपण वेगवेगळे विषय देऊन स्पर्धा घेत आहोत. आलेल्या उत्कृष्ट लेखांना भिडे संमेलनामध्ये भरघोस पारितोषिके दिली जातील. आपला प्रतिसाद हीच 'आम्ही भिडे' अंकाची ताकद आहे. म्हणून 'लिहिते व्हा'. लेख पाठविण्यासाठी पत्ता - **दिलीप वासुदेव भिडे, सी-१०२, मेघमल्हार रागा अपार्टमेंट, एल.एम.डी. चौकाजवळ, मराठा मंदिर मागे, बावधन, पुणे-४११०२१ किंवा dilip.bhide15@gmail.com** ह्या संकेत स्थळावर सुद्धा पाठवू शकता. (शब्द मर्यादा ३०० शब्द फक्त) लेख देताना फूलस्केप कागदावर हस्ताक्षरात किंवा टाईप केलेला असावा. लिखाण मराठीतच असावे. शीर्षक आवश्यक. लेख कागदाच्या एका बाजूस लिहावा. जानेवारी २०२१ च्या अंकापासून प्रत्येक आलेल्या लेखाला प्रसिद्धी दिली जाईल. सोबत एक आयकार्ड साईज फोटो देणे आवश्यक आहे. लेख पाठविण्याची अंतिम तारीख ३० जून २०२१ आहे. विषय खालीलप्रमाणे -

**१) नातीगोती** - माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो जितक्या लोकांच्या संपर्कात असतो तितका तो हुरहुन्नरी राहतो. त्यामुळे माणसे जोडण्याची सवय म्हणा किंवा संपर्कात असताना तो आपलेपणाच्या सहवासात वावरत असतो. तुम्ही सुद्धा वेगवेगळ्या अनुभवांतून, प्रसंगानुसार अशी नाती जोडली असतील. अशी नाती रक्ताच्या नात्यांपेक्षा सुद्धा अधिक मायेची, आपुलकीची होतात व आयुष्यभर ती नाती जपण्यासाठी असलेल्या नात्याची गोष्ट लिहा. यामध्ये शक्यतो रक्ताच्या नात्यांपेक्षा अधिक वेगळे अनुभवलेले नाते अपेक्षित आहे.

**२) स्टार्टअप** - मुले, मुली, गृहिणी, तरुण छोटेखानी व्यवसाय करतात. कमी भांडवल असून सुद्धा धाडस करतात. त्यासाठी मार्केटींग करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करून गुणवत्ता टिकवण्यासाठी हुशारीने व्यवसाय करतात. त्याकरिता भांडवलाची जमवाजमव, कच्चा माल, उद्योग सुरू करण्याची कल्पना सुचणे, तसेच त्या व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि त्यातून मार्ग काढताना आलेले चांगले-वाईट अनुभव, यश-अपयश ह्या दृष्टीने व्यवसायात बसलेला जम हे अपेक्षित आहे.

**३) माझी खादाडी** - मी एका वेळेस एका बैठकीमध्ये ५० गुलाबजाम किंवा ५० पाणीपुरी खाल्या अथवा १५ ते २० ओली भेळ, २० ते २५ केळी एका वेळी फस्त केली. काही आवडीचे खाद्यपदार्थ पैज लावून खाल्ले. असे खाण्याचे विक्रम तुम्ही केलेले असतील आणि त्यातून झालेला त्रास अथवा आनंद कसा झाला ह्याचे रंजक अनुभव पाठवा ज्यामुळे वाचकांना हे आश्चर्य वाटेल.

**४) टोपणनावांची गोष्ट** - बारशाला नामकरण होतं तरीसुद्धा बंड्या, गोट्या, बाळू, बेबी इत्यादींप्रमाणे टोपणनावांने घरात संबोधले जाते आणि आयुष्यभर मूळ नाव विसरून ह्याच नावाने हाक मारली जाते. त्यासाठी घडलेले काही प्रसंग आणि आलेले अनुभव आपल्या शब्दात लिहा.

**५) एका ट्रिपची गोष्ट** - आपल्या कुटुंबासोबत, मित्रांबरोबर किंवा नाते-वाईकांसमवेत पिकनिकला जातो. त्यावेळेस आलेल्या जवळीकीतून आपुलकी, प्रेम निर्माण होते. काहींची त्या निमित्ताने लग्नं सुद्धा ठरतात अथवा ट्रिपमध्ये अभूतपूर्व अशी घडलेली घटना, वाईट घटना आणि त्यातून आलेले चांगले-वाईट अनुभव म्हणजे आयुष्यभर शिदोरी मिळते. त्यानुरूप घडलेले प्रसंग.

**६) रि-युनियन** - लहानपणी गल्लीत, शाळेत, वाड्यात एकत्र असतो परंतु शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने तात्पुरता दुरावा येतो. आयुष्याच्या निवृत्तीच्या टप्प्यानंतर पुन्हा एकत्र येतो आणि त्यावेळेस राग, लोभ, स्वार्थ न राहता असते ती फक्त निखळ मैत्री. आयुष्याच्या रामरगाड्यात असे मिळालेले दोन दिवस एक नवी ऊर्जा देऊन जाते. त्यासाठी आलेले अनुभव.

**७) दाद-फिर्याद** - आपल्या हक्कासाठी, इस्टेटीसाठी न्यायालयात अनेक वर्षे कायदेशीर लढाई करतो किंवा एखादी वस्तू, जमीन खरेदी करताना एक ग्राहक म्हणून आपल्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत किंवा फसवणूक झाली तर ग्राहक पंचायत, न्यायालयाकडे दाद मागावी लागते. त्याकरिता आपल्याला आलेले बरे-वाईट किंवा चांगले अनुभव अथवा त्यामधून आपल्याला काय शिकायला मिळाले ?

**८) भटकंती** - भटकंती करण्यासाठी काही मंडळी देश-विदेशात भेट देतात तर काही कौटुंबिक मेळावा व कार्य ह्या निमित्ताने प्रवास करतात तर काही जण कोणत्याही ट्रॅव्हल्स वा गाईडची मदत न घेता प्रवासाचे नियोजन करतात, काहींसाठी भटकंती म्हणजे विरंगुळा असतो तर काहीजण आवर्जून जिद्दीने भटकंती करतात त्यावेळेस आलेले चांगले-वाईट अनुभव.

**९) शेजारी** - माणूस समाजप्रिय आहे. आपल्या वाडीत, वस्तीत, फ्लॅट संस्कृतीमध्ये सुख-दुःखाच्या क्षणी असणारा शेजार हा रक्ताच्या नात्यापेक्षाही आपुलकीचा वाटतो. कोणत्याही क्षणी, मदतीसाठी धावणारा, जिवापाड प्रेम करणाऱ्या शेजाऱ्यांचा निःस्वार्थ, निःशब्द मैत्रीचा अनुभव.

**१०) शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेताना असलेली आठवण/ आठवणी.**

**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती - **ठाणे जनता सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
विशेष सूचना - रक्कम ट्रान्सफर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**


## अंक ४६ वा

संपादक : **श्री. शशिकुमार केशव भिडे**
कार्यकारी संपादक : **ले. क. सुनिल भिडे,**
संपादक मंडळ : **श्री. दिलीप भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रभाकर शंकर भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. मेघना भिडे, सौ. प्रिती भिडे, सौ. स्नेहल भिडे**
सल्लागार मंडळ : **श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे**
अक्षर जुळणी : **सौ. विनीता डबीर**




**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१


**सहवेदना : भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. (१) श्री. नरेंद्र सदाशिव भिडे, पुणे. २) शरद भिडे, डोंबिवली.**

# झाले जीवन यज्ञ समर्पण



कै. लक्ष्मण श्रीकृष्ण भिडे यांचा जन्म अकोला येथे १९१८ मध्ये झाला. प्रारंभिक शिक्षण चांदा येथे झाले व महाविद्यालयीन शिक्षण नागपूर येथे बी.ए. झाले. नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडित होते. १९३२-३३ चे सुमारास चंद्रपूरमध्ये आलेल्या महापुरामध्ये अनेक कुटुंबांचे प्राण वाचविले. चंद्रपूरमध्ये मा. बाबासाहेब आपटे यांच्या सहवासामुळे १९४१ मध्ये लखनौ मध्ये संघ प्रचारक म्हणून कार्य केले. १९४२ मध्ये डॉ. हेगडेवार यांच्या निधनानंतर गुरुजींनी केलेल्या आवाहनानुसार त्यांनी प्रचारक व्रत स्वीकारले. १९४२ ते १९५७ मध्ये उत्तरप्रदेशमध्ये कार्यरत होते. १९५७ पासून त्यांनी केनिया व नेपाळमध्ये कार्य केले. १९७३ मध्ये विश्व विभागाचे दायित्व दिले. त्यानंतर सुमारे २० वर्षे भारताबाहेर ज्या ज्या देशांत हिंदू आहेत त्या त्या भागात कार्य केले. भाऊराव देवरसांसोबत १९८० मध्ये आफ्रिका, अमेरिका, इंग्लंड, फिजी, मलेशिया, हाँगकाँग देशात हिंदूंसाठी प्रचारकार्य केले. अंगकाठी शिडशिडीत, साधा व सरळ स्वभाव आणि ध्येयपूर्तीसाठी गरजा सुद्धा कमीत कमी असल्यामुळे खर्च सुद्धा कमी होत असे. परदेशात कोणी कार्यकर्त्याने खर्चायला दिलेले पैसे उर्वरित पैसे भारतात परत येताना त्यांना परत करत असत. धोतर आणि कुर्ता हा साधा पोषाख वापरत असत. १९८७ मध्ये त्यांच्याकडे पश्चिम क्षेत्राची जबाबदारी देण्यात आली. १९९२ मध्ये पंडित दिनदयाल शोध संस्थेचे अध्यक्ष झाले. ह्या संस्थेचे कार्यालय दिल्ली येथे होते. त्यामध्ये वातानुकुलित यंत्रणेचा वापर सुद्धा टाळत असत. त्यांच्या कार्यालयामध्ये असलेल्या कपाटांना सुद्धा कधी कुलुपे लावलेली नसत. कमीत कमी गरजा आणि कार्याला समर्पित असे जीवन हा त्यांचा स्थायीभाव होता. १९९५ ते ९७ सरसंघचालक रज्जुभैय्यांच्या बरोबर केनिया, मॉरिशस, दक्षिण आफ्रिका ह्या विदेश यात्रेत सोबत होते. कै. लक्ष्मणरावांच्या प्रेरणेने विश्व संघ शिबिरास २००० मध्ये प्रारंभ झाला. त्यांना विदेश दौऱ्यावर असताना लोक नाना, काका, बाबा ह्या नावाने आदराने हाक मारत असत. विश्व संघाच्या तीनही शिबिरांत उपस्थित होते. विश्व विभागाचे भीष्माचार्य म्हणून परिचित होते. तिसऱ्या विश्व शिबिराच्या वेळेस ते खूप आजारी होते, तब्येत साथ देत नव्हती आणि त्याच सुमारास म्हणजे २००१ मध्ये चिरनिद्रिस्त झाले. **(शब्दांकन - दिलीप भिडे)**

## विवाह सुवर्णोत्सव

**ज्या भिडे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दांपत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दांपत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या जोडीदाराच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षांतील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित केले जातील.**
**✻ अधिक माहितीसाठी संपर्क : दिलीप भिडे, पुणे. मो. ९६५७५४१२३६ किंवा ले. क. सुनिल भिडे (पुणे) मो. ९६२३०१७४४४ किंवा ई-मेलसाठी** office@bhidekul.in **व** dilip.bhide15@gmail.com **येथे पाठवावेत.**

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा | १ |
| २. | सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग | २ |
| ४. | सौ. पूर्वा प्रमोद देवधर, गिरगांव | २ |
| ५. | श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण | २ |
| ६. | सौ. अलका केशव भिडे, पुणे | ६ |
| ७. | श्री. पुष्कर प्रसन्न भिडे, पुणे | ६ |
| ८. | श्री. अभिषेक सुरेंद्र भिडे, इंदौर | १० |
| ९. | सौ. लतिका आपटे, पुणे | ११ |
| १०. | सौ. पूर्णिमा धनंजय भिडे, पुणे | १३ |
| ११. | कु. भूषण गजानन भिडे, अलिबाग | १५ |
| १२. | श्री. केशव मोरेश्वर भिडे, पुणे | १६ |
| १३. | श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली | १७ |
| १४. | श्री. संजय शंकर भिडे, मुंबई | १७ |
| १५. | श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे | १८ |
| १६. | श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | २० |
| १७. | अ‍ॅड. अविनाश ज. भिडे, नाशिक | २१ |
| १८. | सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा | २३ |
| १९. | श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे | २४ |
| २०. | चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी | २४ |
| २१. | श्री. धनंजय केशव भिडे, पुणे | २४ |
| २२. | सौ. अमृता अमित फाटक, पुणे | २४ |
| २३. | सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे | २५ |
| २४. | श्री. मधुसुदन धोंडू भिडे, डोंबिवली | २५ |
| २५. | श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे | २६ |
| २६. | सौ. अपर्णा उमेश भिडे, ठाणे | २६ |
| २७. | श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली | २७ |
| २८. | सौ. केतकी जयराम भिडे, सोलापूर | २७ |
| २९. | कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| ३०. | कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| ३१. | सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे | २८ |
| ३२. | सौ. मृणाल प्रकाश भिडे, माभळे | २९ |

### मे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे | ३ |
| २. | सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली | ३ |
| ३. | सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे | ५ |
| ४. | सौ. स्नेहा नितीन भिडे, पुणे | ५ |
| ५. | श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ | ६ |
| ६. | कु. प्रचिती प्रसदा भिडे, पुणे | ७ |
| ७. | सौ. मिताली मंदार भिडे, रत्नागिरी | ९ |
| ८. | कु. मृण्मय मंदार भिडे, रत्नागिरी | १० |
| ९. | श्री. शरद हरी भिडे, पुणे | ११ |
| १०. | श्री. राजेश शरद भिडे, पुणे | ११ |
| ११. | सौ. कल्याणी विनोद भिडे, औरंगाबद | ११ |
| १२. | श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर | १३ |
| १३. | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | १३ |
| १४. | कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे | १३ |
| १५. | श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे | १७ |
| १६. | श्री. सुनिल कृष्णाजी भिडे, पुणे | १७ |
| १७. | सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल | १९ |
| १८. | सौ. माया सुनिल भिडे, पुणे | १९ |
| १९. | सौ. उज्वला यशवंत भिडे, औरंगाबाद | १९ |
| २०. | सौ. भाग्यश्री दिलीप भिडे, पुणे | २० |
| २१. | कु. ईशान अमित भिडे | २१ |
| २२. | श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे | २२ |
| २३. | कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई | २३ |
| २४. | कु. ओम चंदन भिडे, पुणे | २४ |
| २५. | सौ. अभिलाषा रोहन भिडे | २४ |
| २६. | सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली | २५ |
| २७. | श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे | २६ |
| २८. | कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद | २६ |
| २९. | कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली | २७ |
| ३०. | सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप | २७ |
| ३१. | चि. भार्गवी विक्रांत भिडे, पुणे | २८ |
| ३२. | श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव | २९ |
| ३३. | सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे | २९ |
| ३४. | श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे | २९ |
| ३५. | श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर | २९ |
| ३६. | श्री. विजयसिंह विष्णू भिडे, नाशिक | ३१ |
| ३७. | श्री. विनायक वासुदेव भिडे, रत्नागिरी | ३१ |

### जून

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे | १ |
| २. | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | १ |
| ३. | अमोल मुकुंद भिडे, सांगली | २ |
| ४. | कु. अमृता चंदन भिडे, पुणे | ५ |
| ५. | सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे | ६ |
| ६. | सौ. सुषमा दीपक भट, गोरेगाव | ६ |
| ७. | सौ. स्मिता विजय भिडे, ठाणे | ८ |
| ८. | सौ. आदिती अविनाश भिडे, नाशिक | ९ |
| ९. | सौ. कीर्ती नरेंद्र देव, पुणे | ९ |
| १०. | उदित आशिष भिडे, कल्याण | ११ |
| ११. | सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे | १२ |
| १२. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १२ |
| १३. | सौ. गार्गी आदित्य जोशी, पनवेल | १३ |
| १४. | श्री. आल्हाद प्रमोद भिडे, पुणे | १५ |
| १५. | डॉ. माधुरी प्रसाद भिडे, पुणे | १७ |
| १६. | सौ. संगिता सतिश भिडे, नाशिक | १८ |
| १७. | सौ. स्मिता सतीश भिडे, पुणे | १८ |
| १८. | वेदांग प्रशांत भिडे, डोंबिवली | १८ |
| १९. | कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे | १९ |
| २०. | सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे | २० |
| २१. | श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव | २० |
| २२. | सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक | २१ |
| २३. | श्री. प्रभाकर नारायण भिडे, माभळे | २१ |
| २४. | क्षितीजा गणेश भिडे, पुणे | २१ |
| २५. | सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे | २३ |
| २६. | सौ. नीला कुमार भिडे, पुणे | २३ |
| २७. | श्री. प्रशांत मधुसुदन भिडे | २३ |
| २८. | श्री. सुधीर विष्णू भिडे, बदलापूर | २३ |
| २९. | सौ. शलाका तेजस भिडे, चेंबूर | २४ |
| ३०. | श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे | २६ |
| ३१. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| ३२. | श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल | २९ |
| ३३. | सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर | २९ |
| ३४. | नीलकमल फडके, पुणे | २९ |

**मी-माझं कुटुंब-माझे नातेवाईक या मर्यादित परिघाचं वर्तुळ ओलांडून दुसऱ्यांसाठी धडपडण्यात आनंद मानणाऱ्या सामान्यांमधल्या कर्तबगारांमधल्या कर्तबगारांची ओळख करून देणाऱ्या 'स्वतःपलीकडे' या सदरातून...**

**सौ. अनुश्री आनंद भिडे**, ठाणे



रिझर्व्ह बँकेतून घेतलेली निवृत्ती, दरमहा मिळणारी पेन्शन, ठाण्यासारख्या शहरात निवास, मुलं उत्तमरित्या मार्गी लागलेली, असं एक सुखी, सामाधानी कुटुंब. सर्वसाधारणपणे अशा कुटुंबातले ज्येष्ठ सदस्य आयुष्याची सेकंड इनिंग आनंदात, आरामात घालवायची असा विचार करत असतात, पण याला अपवाद ठरतील असेही काहीजण असतात. ठाण्यात राहणाऱ्या सौ. अनुश्री भिडे त्यांपैकीच एक. लहानपणी अनुश्रीताईंनी आपल्या वडिलांना वेळोवेळी लोकांना मदत करताना बघितलेलं होतं. कळत-नकळत रुजलेले ते संस्कार जाणत्या वयात त्यांनी जोपासले. वाढत्या वयाबरोबर त्यांचा मदतीचा हात अधिकच भक्कम होत गेला. रिझर्व्ह बँकेतल्या नोकरीत त्यांना सुरक्षित, सुखासीन वातावरण मिळत होतं, पण त्यांचं संवेदनशील मन घर ते ऑफिस या प्रवासात आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी टिपत होतं. दोन वेळच्या जेवणासाठी, शिक्षणासाी, आजारपणात उपचारांसाठी लोकांची होत असलेली फरफट त्या बघत होत्या. त्यातूनच त्यांनी दरमहा काही विशिष्ट रक्कम गरजू लोकांच्या मदतीसाठी बाजूला ठेवण्याची सवय लावून घेतली. दर महिन्याला कोणाला ना कोणाला मदत करायची, ही सवय त्यासोबत जडलीच. आता त्या दरवर्षी पाच मुलांच्या शिक्षणाचा खर्च करतात, शाळेची फी भरतात (आतापर्यंत अनुश्रीताईंनी शिक्षणासाठी मदत केलेल्या मुलांची संख्या हजारांच्या वर आहे.) त्यातूनच एका कामवाल्या मावशींची मुलगी आज आयटी क्षेत्रात काम करत आहे. पण त्याशिवाय पाच कुटुंबांना त्या धान्य-किराणा घेऊन देतात. अशा कुटुंबांची संख्या आता पाचशेच्या वर गेलेली आहे. मुलुंडला एक चप्पल शिवणारा कारागीर अनुश्रीताईंच्या ओळखीचा झाला होता. त्याला त्याच्या सुनेने घराबाहेर काढलं होतं. अनुश्रीताई त्याला तो असेपर्यंत दर महिन्याला ५०० रुपयांचा किराणा, खाद्यपदार्थ अनेक वर्षे घेऊन देत असत. पनवेलच्या एका संस्थेतल्या दोन कुष्ठरुग्णांच्या मुलींना त्यांनी दत्तक घेतलेलं ाहे. म्हणजे त्यांचा पूर्ण खर्च त्या करतात. इतकंच काय, त्या दरवर्षी या संस्थेतील कुष्ठरुग्णांची सहल आयोजित करतात. कुष्ठरोगी हे तुमच्या-आमच्यासारखेच आहेत, त्यांची उपेक्षा करू नका, त्यांच्याशी माणुसकीने वागा, ही शिकवण बाबा आमटे यांनी दिली. त्यानंतर अनेकांनी पैशांच्या, धान्याच्या, कपड्यांच्या, औषधांच्या रूपाने मदत करत माणुसकीचा झरा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवला. पण याच्याही पलीकडे त्यांच्या काही गरजा असू शकतील हे अनुश्री यांनी ओळखलं आणि सहल सुरू केली. ही झाली त्यांची नियमितपणे चालू असलेली मदत. नैमित्तिक कामांसाठीही अनुश्रीताईंचा मदतीचा हात सदैव पुढे असतो. अनुश्रीताईंच्या या मदतींची यादी खूप मोठी आहे. अनेकजणांना आजारपणाचा खर्च भागवण्यासाठी अनुश्रीताई आर्थिक मदत करतात. त्यात कॅन्सरसारखे दुर्धर आजार असोत अथवा अपघातामुळे अचानक उद्भवलेलं आजारपण असो. अनुश्रीताई दवाखान्यात जाऊन पेशंटला भेटतात, डॉक्टरांशी बोलतात, उपचारांचा एकूण खर्च किती आहे ते बघतात आणि शक्य असेल तितकी मदत करतात. हवालदिल झालेल्या पेशंटच्या नातेवाइकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळतो. एकदा त्यांच्या मैत्रिणीच्या घरी कामासाठी येणाऱ्या मावशींना अचानक एका डोळ्याने दिसेनासं झालं. दुसरा डोळाही अधू होता. अनुश्रीताई स्वतः त्यांना डोळ्यांच्या डॉक्टरांकडे घेऊन गेल्या आणि त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तातडीने त्यांचं ऑपरेशन करवून घेतलं. अर्थातच ऑपरेशनचा खर्च अनुश्रीताईंनी केला. अनुश्रीताईंनी काही दिव्यांग मुलांची लग्नं लावून दिलेली आहेत. अधिक महिन्यात दानधर्म करण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. चार-पाच वर्षांपूर्वी एका अधिक महिन्याच्या निमित्ताने त्यांनी ३३ मुलांची फी भरायचं ठरवलं, पण प्रत्यक्षात जवळपास ७० मुलांची फी त्यांनी भरली. दुष्काळग्रस्त बीड जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला मदत करण्यासंबंधी त्यांना एका परिचितांनी सुचवलं. या भागात पाऊस कमी, पाण्याचे स्रोत कमी. त्यामुळे कित्येक छोट्या शेतकऱ्यांना एखादं पीक कसबसं घेता येतं. काहींना तर स्वतःची जमीन असली तरी पोटापाण्यासाठी मजुरीची कामं करावी लागतात. अनुश्रीताईंनी त्या शेतकऱ्याला शेततळं बांधण्यासाठी आर्थिक मदत केली. त्याचं नशीबच तेव्हापासून बदललं. स्वतःच्या शेतात भाजीपाला-धान्य पिकवून त्यावर त्याचा उदरनिर्वाह व्यवस्थित सुरू झाला आहे.

पुण्यात दरवर्षी वीणा गोखले या 'देणे समाजाचे' हे आगळंवेगळं प्रदर्शन भरवत असतात. त्यात सामाजिक काम करणाऱ्या संस्था आणि त्यांच्या कामाची माहिती लोकांना मिळते. वीणाताई त्या संस्थांची आणि कामाची खात्री करूनच मग त्यांना सहभागी करून घेतात. अनुश्रीताई या प्रदर्शनाला नियमितपणे भेट देतात. त्यातून त्या गरजू संस्थांची निवड करतात आणि त्यांना यथाशक्ती देणगी देतात. त्यांनी असे लाखो रुपये निरनिराळ्या संस्थांना आणि व्यक्तींना दिलेले आहेत. महाराष्ट्रभर अनुश्रीताईंच्या मदतीचा ओघ वाहत असतो. अलीकडेच पुण्यातल्या योगेश आणि सुमेधा चिथडे या दांपत्याने सियाचिन इथे जवानांसाठी ऑक्सिजन प्लांट उभारण्यासाठी पैसे उभे केल्याची बातमी आपण सर्वांनीच वाचली असेल. सुमेधाताईंनी त्यासाठी स्वतःचे दागिनेदेखील मोडले. ही बातमी अनुश्रीताईंनी वाचली आणि त्यांनीही स्वतःचे सारे दागिने मोडून काही लाख रुपयांची देणगी या प्रकल्पासाठी दिली. अनुश्रीताई अशी मदत करतात हे आता बऱ्याचजणांना माहिती आहे. त्यामुळे अडीनडीला लोक हक्काने त्यांच्याकडे जातात. मात्र स्वतः भेटून, गरजवंतांची परिस्थिती बघून मगच त्यांना मदत करायची की नाही आणि किती करायची ते ठरवतात. आतापर्यंत एखादा अपवाद वगळता फसवणुकीचे

अनुभव त्यांना फारसे आलेले नाहीत, पण तरीही खबरदारी घ्यावीच लागते. आपण करत असलेली मदत, दान सत्पात्री जावं यावर त्यांचा कटाक्ष असतो. विशेष म्हणजे अनुश्रीताईंच्या या दातृत्वाला त्यांच्या घरच्या मंडळींची पुरेपूर साथ मिळालेली आहे. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यापासून कोरोनाच्या साथीने विळखा घातला आणि सामाजिक आर्थिक वातावरण ढवळून निघालं. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, व्यवसाय बंद पडले. अनेकांचे जेवणाखाण्याचे हाल सुरू झाले. बातम्यांमधूद याचे तपशील वाचायला-ऐकायला मिळत होते. घराबाहेर पडणं शक्य नव्हतं. अनुश्रीताई अस्वस्थ झाल्या. अनेक संस्थांना त्यांनी फोन केले, काही मदत मिळतीय का विचारलं. बऱ्याच सामाजिक संस्थांना या काळात आर्थिक मदत मिळणं अवघड झाल्याचं त्यांच्या लक्षात आलं. लॉकडाऊन संपला, थोडेफार व्यवहार सुरू झाले आणि अनुश्रीताईंना या संस्थांना मतद पाठवायला सुरुवात केली.

आधी म्हटल्याप्रमाणे निवृत्तीनंतरचं आयूष्य हवी ती मौजमजा करण्यात घालवणं अनुश्रीताईंना सहज शक्य आहे. पण समाजाचं देणं काही प्रमाणात का होईना, फेडण्यात जो आनंद, समाधान मिळत आहे त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही, असं त्या म्हणतात.

*(सौजन्य - 'अनुभव' मासिक अंक, जानेवारी २०२१)*

**लेखन स्पर्धा २०२१**
**लेखांक : भाग १३**

## फौजी



जीवनात अनेक जण येतात आणि त्यातून नाती विणली जातात. काही विसविशीत कापडासारखी कधीही उसवणारी, तर काही लादलेली, कापडावरील ठिगळासारखी, काही रक्ताची जन्मापासून आवडो न आवडो, मृत्यूपर्यंत येणारी. आणि काही विधात्याने निर्माण केलेली माणुसकीची, मैत्रीची, सहज नकळत जुळून आलेली. असेच एक नाते मी गेली बत्तीस वर्षे अनुभयतोय. सहज जमलेले, मानलेले आणि हळुवारपणे जपलेलं. माझ्या पत्नीचा मानलेला भाऊ अनिल ढोले. अनिल ढोले हा माझा मेहुणा अनिल फडके यांचा लहानपणाचा मित्र. नंतर त्याच्या दवाखान्यातील कर्मचारी, त्यामुळे लहानपणापासून तो बराच वेळ माझ्या सासुरवाडीत असे. त्यातून अश्विनी (केतकी) भिडे-फडकेशी भावा-बहिणीचे नाते जोडले गेलेले. अनिल गुरव हा अनेक प्रकारच्या कामात हुशार, आणि घरात दोन अनिल म्हणून याचे कधीतरी नामकरण झालेले ... फौजी. आमच्या लग्नानंतर प्रत्येक राखी पौर्णिमेला फौजी नियमित सोलापूरला येणार म्हणजे येणार. उमापूर (गेवराईजवळ) वरून येताना सासुरवाडीतून येणारे कोयीचे आंब्याचे लोणचे, चिवडा आणि फौजीने घेतलेला कुंथलगिरीचा खवा, पेढे हमखास येणारच. त्यांच्याकडे गावातील शंकराच्या देवळाचे गुरवकी. त्यामुळे श्रावण म्हणजे अतिशय व्यस्त महिना. गावात बेल वाटणे, अभिषेक करणे अशा अनेक कामांत तो व्यस्त असतो आणि त्यात त्याची नोकरी. त्यातून वेळ काढून एक दिवसात तो सोलापूरला येऊन जातो आणि नात्याचा धागा घट्ट करतो. लहानपणी ऋषी, नेहा तो आला की फौजी मामा-मामा करून त्याच्याशी खेळत.ऋषी, नेहा यांचा लग्नाकरिता 'मामा म्हणे मी मामा येईन कामा धामा' या म्हणी प्रमाणे फौजी मामा-मामी हजर. कोणतेही काम मनापासून करणे हा तर त्याचा गुणच. नात्यातील गोडवा काय असतो आणि तो मुलांच्या मनावर काय परिणाम करतो हे नेहाच्या लग्नात ठळकपणे जाणवले. नेहाने लग्नास उभारताना फौजी मामा पण माझ्या बरोबर येईल असं आवर्जून सांगितलं होतं. आज ही मुले त्याला फोन करतात आणि त्याची विचारपूस करतात.

आज सकाळी त्याचा फोन झाला. कोविडमुळे जिल्हा बंदी असल्याने येऊ शकत नाही. राखी पौर्णिमेला त्याचे नसणे आज ठळकपणे जाणवत आहे. नाते कोणतेही असो त्याला आपुलकीचे खतपाणी मिळाले की ते निसर्गनियमाने बहरतेच. **– जयराम भिडे, सोलापूर, ८६६८६१२७५२**

## शैक्षणिक मदत

भिडे प्रतिष्ठानचे माजी लेखापरीक्षक श्री. विजयराव रघुनाथ आणि त्यांचे बंधू श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे यांनी आपले वडील स्व. रघुनाथ व्यंकटेश आणि आई स्व. मालती रघुनाथ भिडे, ठाणे यांचे स्मरणार्थ भिडे प्रतिष्ठानकडे शैक्षणिक निधी म्हणून विद्यार्थिनींसाठी प्रत्येकी रोख रु. ११,००० असे एकूण रु. २२,००० दिलेले आहेत. अशा प्रकारे शैक्षणिक निधीसाठी मदत म्हणून दरवर्षी हे भिडे बंधू देत आहेत. त्याप्रमाणे खालील विद्यार्थिनींना आर्थिक मदत देण्यात आली.

१) कु. चैताली संजय भिडे, सांगली .................. रु. ३,०००
२) कु. आस्था केदार भिडे, पुणे ........................ रु. २,०००
३) कु. क्षितीजा गणेश भिडे, पुणे ...................... रु. ४,०००
४) कु. प्रणिती अभित भिडे, पुणे ...................... रु. २,०००
५) कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली ................. रु. २,०००
६) कु. अश्विनी अशोक भिडे, पुदुर, कर्नाटक.......... रु. ३,०००
७) कु. भाग्यश्री मंदार भिडे, डोंबिवली ................. रु. २,०००
८) कु. नियती मंदार भिडे, डोंबिवली .................. रु. २,०००
९) कु. मंजिरी भिडे, डोंबिवली ........................ रु. २,०००

## देणगीदारांची यादी जानेवारी ते मार्च २०२१

| | | |
|---|---|---|
| सौ. गिरिजा गणेश भिडे, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| सौ. अमृता अमित फाटक, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| श्री. विनायक वासुदेव भिडे, रत्नागिरी | रु. ९०० | आजीव सभासद (भाग) |
| श्री. ओंकार विनायक भिडे, रत्नागिरी | रु. १,००० | आजीव सभासद |
| श्री. गिरीश प्रभाकर भिडे, पंढरपूर | रु. १,००० | आजीव सभासद |
| श्री. विजयराव रघुनाथ भिडे, ठाणे | रु. ११,००० | शैक्षणिक देणगी |
| श्री. सुरेशराव रघुनाथ भिडे, ठाणे | रु. ११,००० | शैक्षणिक देणगी |
| श्रीमती रोहिणी सोमण, पुणे | रु. १,१११ | देणगी |
| सौ. शलाका तेजस भिडे, चेंबूर | रु. १,००० | आजीव सभासद |
| श्री. आशीर्वाद राजेंद्र भिडे, दादर | रु. १,००० | आजीव सभासद |
| श्री. भालचंद्र सदाशिव भिडे, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद (भाग) |

लेखांक : भाग ६

# एक साहस योग - लेह - लडाख

सौ. नेहा किरण सातर्डेकर (भिडे)
मो. ९००४०७८४३३, डोंबिवली

पेंगाँगवरून आम्ही दमून हॉटेलला परतलो आणि आज जरा आराम करू, सामान आवरून ठेवू असं म्हणून हॉटेलमध्येच रेंगाळलो. त्या दिवशी हॉटेलमध्ये आम्हाला एक अनोखा अनुभव मिळाला. अनुराधा प्रभुदेसाई यांच्या 'लक्ष्य फाऊंडेशन'चे मुंबई-पुण्याहून जवळपास ४० कार्यकर्ते आले होते. कारगिल युद्धात कामी आलेल्या आणि आपलं योगदान दिलेल्या अनेक जवानांच्या कामाचा गौरव आणि त्यांच्या कुटुंबीयांचं पुनर्वसन यासाठी मोलाचं योगदान देणारी ही संस्था. आम्हाला प्रत्यक्ष अनुराधाताई आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना ज्यामध्ये असे अनेक आर्मी ऑफिसर्स ज्यांचा कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभाग होता अशा अनेकांना भेटायची संधी मिळाली. त्यांचे अनुभवकथन ऐकून आम्ही थक्क झालो आणि भारावून गेलो. या सगळ्यात आम्हाला दुसऱ्या दिवशीची तयारी करायला वेळच नाही मिळाला. बरीच रात्र झाली होती आणि सकाळी लवकर निघायचं म्हणून आम्ही पटापट सामान आवरून झोपून गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी आवरून बाहेर पडायला ८ वाजून गेलेच. पुन्हा एकदा लेह-मनाली हायवेने जाऊन Shey-Karu-Upshi या गावातून आम्ही 'त्सो मोरिरी' च्या रस्त्याला लागलो. लेह-त्सोमोरिरी हे अंतर साधारण २२०-२४० कि.मी.चे म्हणजे तसा लाँगेस्ट डिस्टन्स ट्रॅव्हल असणार होता. लेहपासून Shey आणि पुढे Karu या गावापर्यंत रस्ता अतिशय चांगला होता पण Upshi या गावात जिथे एक रस्ता मनालीकडे आणि एक त्सोमोरिरीकडे जातो तिथे आम्ही वळलो मात्र अतिशय खराब रस्ता सुरू झाला. डावीकडे डोंगर, उजवीकडे इंडस नदीचा एक प्रवाह असा वळणावळणाचा रस्ता, पण हे डोंगर जरा जास्त अंगावर येणारे, भकास वाटणारे होते. मध्ये मध्ये छोटे पूल लागत होते. नदीच्या छोट्या पात्रावर असाच एक प्रसिद्ध पूल जिथे थ्री इडियट्स मधला एक सीन चित्रित केला गेलाय तिथे आम्हाला त्सिरिंगने उतरवलं आणि आमचे यथेच्छ फोटो काढून दिले. आमच्यापेक्षा आमचा त्सिरिंगच जास्त हौशी होता. एवढ्या टुरिस्टना फिरवत होता तो त्यामुळे कुठल्या स्पॉटला काय काय पोझेस देऊन फोटो काढून घेतात लोकं हे त्याला पक्कं ठाऊक होतं. आम्हाला फोटो काढायला उतरा असं सांगून हा पठ्ठ्या स्वतः मात्र रस्त्यावर बैठक मारून सिगारेट शिलगावून सैलावायचा. कधीतरी तर रस्त्यावर चक्क आडवा व्हायचा इतका दमून जात असे तो. आम्ही त्याला काळजीपोटी प्रेमाने दटावत असू की बाबा रे एवढ्या सिगारेट ओढणं आरोग्यासाठी चांगलं नाहीये, यावर तो हसून म्हणायचा, 'वो तो है !' एवढ्या खराब रस्त्यावरून तासन्तास मैलोगणती गाडी हाकताना त्याच्यावर नक्कीच स्ट्रेस येत असेल आणि म्हणून सिगारेट ओढून तो ताण हलका करायचा प्रयत्न करत असावा. डोक्याने थोडा तापट असलेला त्सिरिंग समोरचा गाडीवाला जर चुकला तर त्याला सणसणीत शिवी हाणत असावा. (कारण त्याच्या भाषेत काय बोलतो हे आम्हाला कळायचं नाही पण आवेश तरी तसाच असायचा.) पण माणूस म्हणून सहृदयी आणि प्रेमळ होता. आम्ही पुढे निघालो, मध्येच त्सिरिंग म्हणाला, 'मॅडम ये रास्ता बहोत बोरिंग है, आपको नींद आयेगी. मुझे तो ड्रायव्हिंग करने का बिलकुल मजा नहीं आ रहा है' मी रोजसारखंच पुढे बसून रस्त्याचे, डोंगरांचे फोटो काढत होते तेव्हा मला त्याच्या बोलण्यात तथ्य असल्याचे जाणवले. दोन्ही बाजूला ओसाड, रुक्ष आणि भकास वाटणारे डोंगर जणू आमच्या अंगावर येत होते. त्सोमोरिरीकडे जाणारा हा रस्ता खराब तर होताच पण इतका बोरिंग होता ना की प्रवास थोडा कंटाळवाणा होऊ लागला होता. झोप येऊ नये म्हणून थोडी ढिंगचॅक गाणी हा मोठ्ठ्याने लावून ठेवायचा जेणेकरून रस्ता लवकर संपेल. तीच तीच गाणी ऐकून आणि त्सिरिंग आमच्या गाण्यांवर ठेका धरून मध्येच एखादा मराठी शब्द उच्चारून आमच्यात सामील होत मज्जा घेत ड्राईव्ह करू लागला. त्यालाही जरा हुरूप आला आणि उत्साहाने म्हणू लागला, 'अब मुझे भी मराठी सिखनी पडेगी.' चुमाथांग नावाच्या गावात आम्ही जेवण्यासाठी थांबलो. २ छोटी बाळं हॉटेल कम दुकानात खेळत होती. त्यांच्या आया ऑर्डर घेण्यासाठी तत्पर होत्या. आमचा नेहमीच आवडता आणि सगळ्यात सेफ मेनू प्लेन आणि मसाला मॅगी ऑर्डर करून आम्ही त्या दोन पिल्लांशी खेळत बसलो. अतिशय हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या त्या दोन माता पोटाच्या वीतभर खळगीसाठी काबाडकष्ट करत होत्या आणि या सगळ्याची कसलीच चिंता नसलेली ती दोन बाळे बाल लीलांमध्ये रमली होती. आम्ही त्या गोंडस लाल गोबऱ्या बाळांचे फोटो आणि व्हिडिओ काढले तेव्हा दोघे मस्त पोझ देत होती. जेऊन निघालो आणि इतका खराब रस्ता सुरू झाला की काही ठिकाणी डोंगरावरून ग्लेशियर वितळून येणाऱ्या पाण्याचे खळाळणारे लोंढेच ओलांडून जावं लागत होतं. तिथे रस्ता गायब झालेला असायचा आणि फक्त खळकाळ, दगडधोंडे आणि त्यावरून वाहणारे मोठ्ठाले ओढे होते. एकामागोमाग एक असे कित्येक अंगावर येणारे डोंगर चढून उतरून पार करताना त्सिरिंगच्या ड्रायव्हिंगची कसोटी लागत होती. रस्ता संपता संपत नव्हता आणि आम्ही ताटकळून गेलो होतो. जेवणाच्या ब्रेकनंतर तब्बल अडीच तीन तासांनी आम्ही त्सोमोरिरीच्या जवळ पोचलो. मोकळे पठार, त्यातून जाणारा कच्चा रस्ता सदृश्य मळलेली वाट आणि त्यावरून भन्नाट वेगाने जाणारी आमची गाडी. आता खूप दूर दूर वर डोंगर दिसू लागले

आणि एक छोटासा लेक दिसला, बाजच्या पिवळ्या गवताळ कुरणात मेंढ्या (पश्मिना गोटस) चरत होत्या. त्सोमोरिरी जवळ आल्याची चाहूल लागली आणि त्सिरिंग म्हणाला, 'चलो आ गया लेक, उतर जाओ'. म्हटलं अरेच्या हा तर एकदम छोटुसा लेक दिसतोय, हा एवढासा पाहायला का आलोय एवढ्या लांब आपण ? मग हसला आणि म्हणाला अजून थोडी वाट बघा, सब्र का फल मीठा होता है ! त्याला सवय होतीच पण खरी परीक्षा आमच्या पेशन्सची होती. या पठारावरून छोट्या लेकला वळसा घालून आम्ही अजून मोठ्ठे पठार पार केले आणि समोरचे विहंगम दृश्य बघून डोळे विस्फारले. पेंगाँग सारखीच मागे डोंगरांची महिरप आणि पुढे पसरलेला विस्तीर्ण जलाशय - त्सो मोरिरी, १४८०० फुटांवर असलेल्या या लेकची लांबी १९ कि.मी. आहे. इंडो-तिबेटीयन बॉर्डर फोर्स इथे तैनात असतो. चायना बॉर्डरच्या जवळ असलेला हा लेक खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. निळ्या रंगाच्या असंख्य शेड्स असलेला हा जलाशय एक वेगळीच मोहिनी घालतो. आपल्या भारतीय टुरिस्टस् पेक्षा फॉरिन टुरिस्ट इथे जास्त येतात. तसंही आपल्यापेक्षा पर्यटनाच्या बाबतीत वे अहेड असतात हे लोक. ॲडव्हेंचर टुरिझम हा त्यांचा प्रांत. याची प्रचिती आम्हाला लगेचच आली. लेकच्या बाजूने जाणारा नागमोडी रस्ता आम्हाला आमच्या हॉटेल मुक्कामापर्यंत घेऊन गेला.

पेंगॉन्गसारखे तंबू नव्हते म्हणून आम्ही सुटकेचा निश्वास टाकला. स्वच्छ, मोकळ्या छोट्या रूम्स असलेलं हे हॉटेल आवश्यक त्या सर्व सोयींनी सुसज्ज होतं. आम्ही चहा घेऊन लगेचच लेककडे जायला निघालो. हॉटेल ते लेकच्या काठावर जाणारा रस्ता हिरव्या पिवळ्या गवताळ कुरणातून जाणारा होता. साधारण तीस एक मिनिटं चालत जावं लागणार होतं. आमचा मोठा ग्रुप बघून एक फॉरिनर मॅडम आमच्या दिशेने चालत आल्या. त्यांच्या बोलण्यातून कळलं की त्या एका मैत्रिणीसोबत इथे आल्या आहेत आणि तिला त्रास होत असल्याने ती रूम मध्ये झोपलीये म्हणून त्या एकट्याच फिरायला निघाल्या आहेत. साधारण ५०+ वय असलेल्या स्वित्झर्लंडहून आलेल्या तान्या मॅडम एकदम बडबड्या आणि हौशी होत्या. मी येऊ शकते का तुमच्या सोबत असं विचारून उत्तराची वाट न बघता त्या लगेच आम्हाला जॉईन झाल्या. कंपनीकडून मिळालेली २ आठवड्यांची स्पॉन्सर्ड ट्रीप म्हणून त्या इथे आल्या होत्या. हॉटेल ते लेकपर्यंतचा रस्ता त्यांच्याशी गप्पा मारण्यात कसा गेला कळलंच नाही. पेंगॉन्गसारखाच इथेही भन्नाट वारा आणि संध्याकाळी वाढणारा गारठा - आम्ही सगळेच पुन्हा अंगावर ४-५ स्तर चढवून होतो. चालताना चांगलाच दम लागत होता पण आमची बडबड काही थांबत नव्हती. आमच्या प्रत्येकाशी तान्या मॅडमनी ओळख करून घेतली आणि आम्ही फॅमिली मेंबर्स कसे मस्त ग्रुपमध्ये ट्रिप एन्जॉय करतोय या गोष्टीचं ४-५ वेळा कौतुक करून दाखवलं त्यांनी. त्यांना आमचा हेवा वाटत असावा. सगळ्यांशी दोस्ती झाल्यावर त्यांच्या सोबत आमच्या आणि त्यांच्या मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले. आमचं बघून लेकच्या नयनरम्य काठावर फोटो काढून घेण्याची लागण त्यांनाही झाली आणि आम्ही सगळ्यांनीच त्या सुंदर देखण्या नजाऱ्याचे भराभर फोटो काढून घेतले. दूरवरच्या बर्फाच्छादित डोंगरांचा देखावा तलावाच्या सौंदर्यात अधिकच भर घालत होता. पेंगॉन्ग इतकंच देखणं रूपडं लाभलेला त्सोमोरिरी लेक एक वेगळंच गूढ वलय लेऊन आमच्यासमोर अथांग पसरला होता. नजर ठरत नव्हती इतक्या दूरवर विस्तारलेली त्सोमेरिरीची क्षितिजरेखा अतिशय सुंदर, स्वर्गीय भासत होती. एखाद्या चित्रकाराच्या कुंचल्यातून साकारलेली, रंगसंगतीचा उत्तम नमुना असलेली जिवंत कलाकृती जणू त्यातली प्रत्येक चौकट अप्रतिम, वेड लावणारी, भुरळ घालणारी. निळेशार पाणी, वाऱ्याच्या लकेरींवर हलणाऱ्या लाटा आणि आमच्या मनाच्या तळ्यात उठणारे उत्साहाचे तरंग एकमेकांत अलगद मिसळून गेले जणू. पुन्हा तीच स्वर्गीय अनुभूती, तसंच तल्लीन होऊन रमून जाणं आणि समाधी लागणं. निसर्गाचं हे अलौकिक देणं 'घेता किती घेशील दो करांनी (डोळ्यांनी)' अशी आमची अवस्था. तब्बल अर्धा-पाऊण तास लेकच्या सान्निध्यात ऊर भरून श्वास घेऊन झाल्यावर (कापूर ओढताना नकळत दीर्घ श्वसन होतंच होते आणि दम लागल्याने करावेच लागत होते) आम्ही नाईलाजाने हॉटेलकडे परतायला लागलो. अर्ध्या तासाची पायपीट करून झाली आणि हॉटेलला पोचल्यावर जाणवू लागलं की high altitude मध्ये जास्त एक्झर्शन करायचं नसतं आणि आम्ही तर चक्क एक-दीड तास चालून आलोय. हॉटेलला आल्यावर फ्रेश झालो आणि डायनिंग हॉलमध्ये जमलो. गरम गरम सूप, रोटी, सब्जी आणि मस्त शेवयांची खीर असा मेनू होता. चालून दमल्याने भूक होती पण सगळ्यांनाच थोडं अस्वस्थ होऊ लागलं होतं. पटापट जेवलो खरे पण आमच्यातल्या अनेकांना खरोखर एक्झर्शन झाल्याचे जाणवू लागले. मला थोडं गरगरायला लागलं, बहिणीला उलटीसारखं सेन्सेशन वाटायला लागलं. किरण आणि त्याच्या बहिणीला श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. नाक चोंदल्यासारखं, घुसमटल्यासारखं व्हायला लागलं. सगळ्यांना एकाएकी त्रास सुरू झाला. आमच्यापैकी काहींनी एअरपोर्टवर ऑक्सिजन कॅन घेतले होते त्यातून ३-४ पफ घेतले प्रत्येकाने आणि झोपायला आपापल्या रूम्समध्ये गेलो. थंडी वाढली होती. पण रूम उबदार होती. जाड रजई, आतमध्ये पातळ गादी असं सगळं असल्याने थंडी वाजत नव्हती पण विरळ हवामानाचा आणि कमी ऑक्सिजनचा चांगलाच त्रास होऊ लागला होता. दारं-खिडक्या बंद आणि आतमध्ये घुसमट अशी अवस्था. पेंगॉन्गसारखा तंबू नसून बंदिस्त हॉटेल होतं तरीही त्रास मात्र जास्त व्हायला लागला. कापूर हुंगत, दीर्घ श्वसन करत झोपायचा प्रयत्न केला खरा पण जरा बेचैनच वाटत होतं, नेमकं काय होतंय कळेना... नामस्मरण सुरू केलं आणि त्याच विचारात झोप लागली. रात्री २ नंतर पुन्हा तोच त्रास, अशक्य

डोकेदुखी-डोकं फुटायची वेळ आली. अचानक लक्षात आलं आपण काल रात्री डायमॉक्स घेतलीच नाहीये मग वाटून गेलं हा त्याचाच परिणाम असावा. आता आपल्याला सवय झालीये हा ओव्हर कॉन्फीडन्स नडला होता. गुपचूप उठून पेनकिलर घेतली आणि झोपायचा प्रयत्न केला पण तरीही झोप लागेना. शेवटी पहाटे ५ ला फटफटलं आणि मगच झोप लागली. सकाळी ६.३० ला उठल्यावर डोकं जड झालं होतं, उठवत नव्हतं, काहीतरी बिनसलंय असं जाणवत होतं. पण आता जास्त वेळ थांबण्यात अर्थ नाही म्हणून लवकर निघायचं असं ठरलं म्हणून नाईलाजाने उठले तेव्हा कळलं की जवळपास प्रत्येकालाच हा त्रास झाला होता, कोणाचं नाक चोंदलं, कोणाला श्वास घ्यायला त्रास तर कोणाची डोकेदुखी. परतीच्या प्रवासाला निघायचं म्हणून जेमतेम आवरून, चहा नाश्ता करून गाडीत येऊन बसलो. अगदी मरगळ आली होती, कोणालाच फार काही उत्साह नव्हता. त्सिरिंग म्हणाला, 'क्या हुआ मॅडम आपको ? कल तो आप बहुत जोश में थी - फोटो निकाल रही थी, आज एकदम से क्या हुआ ? त्याला म्हटलं, 'आज तबियत बिलकुल ठीक नही है, सबको कुछ ना कुछ हो रहा है'. त्याने लगेच तत्परतेने मला आणि गाडीतल्या प्रत्येकाला ऑक्सिजन घ्यायला सांगितलं आणि आम्ही प्रत्येकाने एकेक करून चक्क ऑक्सिजन सिलेंडरच्या नळ्या नाकात घालून ऊर भरून प्राणवायू साठवून घेतला. त्सोमेरिरी अशा तऱ्हेने लक्षात राहील असं वाटलं नव्हतं. पण high altitude चा सगळ्यात जास्त त्रास कुठे झाला असेल तर तो तिथेच. त्सिरिंग म्हणे, 'आपण थोडं खाली उतरलो की सगळ्यांना बरं वाटेल' आणि अगदी तसंच झालं. जसजसे डोंगर पार करत थोडं खाली उतरलो तसं आम्हाला बरं वाटायला लागलं, थोडं फ्रेश वाटू लागलं. आमची सगळ्यांची अवस्था बघून त्सिरिंगने बडबड करून आमची एन्टरटेन्मेंट केली आणि गाडी एकदम सुसाट हाकली. येताना नेहमीसारखाच मोठे दगड-धोंड्यांचा आडोसा बघून बायो ब्रेक घेतला आणि थेट उपशीला जेवायला थांबलो. कुठल्याही प्रवासात मुक्काम स्थळी जाताना लांब वाटणारा, न संपणारा रस्ता येताना मात्र अचानक छोटा झाल्यासारखे, अंतर कमी झाल्यासारखे वाटू लागते तसेच झाले. पटकन जेवायच्या मुक्कामी पोचलो आणि आम्हाला एकदम हलकं, उत्साही वाटू लागलं. high altitde sickness चा एक जबरदस्त प्रत्यय त्सोमोरिरीने आम्हाला दिला आणि आमच्या अनुभवात मोलाची आणि महत्त्वाची भर टाकली. जेवून लेहला परतलो आणि पुन्हा एकदा खरेदीवर शेवटचा हात फिरवायचा असं ठरवून जितके दमलो होतो त्याच्या दुप्पट उत्साहात लेक मार्केटला जाऊन भराभर आवश्यक ती खरेदी उरकून टाकली. आम्ही हॉटेलला परत आलो आणि काय आश्चर्य ? आम्हाला एक सुखद धक्का - आम्हाला आमच्या हॉटेल मालकाने म्हणजे स्टॅझीनने एका रात्रीसाठी दुसरं मोठं हॉटेल अपग्रेड करून दिलं होतं. एव्हाना आम्ही 'The Kaal' मध्ये चांगलेच रुळलो होतो, तिथलं उत्तम, स्वादिष्ट जेवण, नाश्ता मायेने आग्रह करून वाढणारा हॉटेलचा स्टाफ, आणि कम्फर्ट देणारं घरच्यासारखा फील देणारं वास्तव्य यामुळे 'काल' म्हणजे आमचं घरच झालं जणू. दररोज सकाळी 'काल'मधून २ दिवसांच्या कपड्यांची बॅग भरायची आणि बाकी बॅग्ज (वापरलेल्या कपड्यांच्या) हॉटेलच्या लॉकर रूममध्ये ठेवून पुढच्या दिवशी रात्री 'काल'मध्ये परतायचं असा आमचा गेले ८ दिवसातला दिनक्रम होता. त्यादिवशी बहुधा हॉटेल फुल असल्याने आमच्या स्टॅझीनने त्याच्या काकांच्या (लडाख सराई या ३ स्टार हॉटेलमध्ये शिफ्ट करायचं ठरवलं होतं. त्यानुसार ड्रायव्हरसाहेबांनी आम्हाला लेहपासून थोडं दूर साबू या गावात असलेल्या पॉश लडाख सराईमध्ये सोडलं. ते हॉटेल बघून आम्ही हरखून गेलो. एकदम रॉयल वाटावं असं infrastructure, ambience, आणि उत्तम लाकडी कोरीव काम असलेल्या, उत्तम डिझाईन आणि रंगसंगतीने सजवलेल्या शाही डिलक्स फॅमिली रूममध्ये आम्हाला ॲकोमोडेशन मिळालं. आम्ही इतके खूष झालो ना की लेह हून निघताना एवढा सुंदर अनुभव आम्ही सोबत घेऊन जाणार आहोत या जाणिवेने पुन्हा एकदा वाटून गेलं की, 'भगवान जब देता है तो छप्पर फाड के देता है।' आम्ही स्टॅझीनच्या वडिलांना आणि काकांना तिथे भेटलो आणि त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. उत्तम आदरातिथ्य आणि हॉस्पिटॅलिटीचा अजून एक देखणा अनुभव आम्हाला या निमित्ताने मिळाला. सिझनमध्ये साधारण ९-१० हजार रुपये पर डे असा रेट असलेलं हॉटेल सहजपणे अपग्रेडम्हणून मिळावं हे म्हणजे चेरी ऑन द केक असंच होतं. आम्हाला लडाख सराईमध्ये वेलकम ड्रिंक म्हणून तिथली स्पेशालिटी असलेलं Sea buckthorn Juice आणि Apricot Juice दिलं. त्या रात्री त्या शाही प्रशस्त हॉटेल वास्तव्याचा अनुभव घेत घेत आम्ही आमच्या बॅग्ज पॅक केल्या. लेह मार्केटवरून केलेली खरेदी आणि वापरलेले कपडे तर बॅगमध्ये नीट रचून भरले गेले. पण गेल्या ९ दिवसांच्या प्रवासात भरभरून जगलेले क्षण, दीर्घ प्रवासाची उत्कंठा, निसर्गाची बहुरंगी रूपं, रंगीबेरंगी अभेद्य डोंगरांचा कणखरपणा, खारडुंगलाची पांढरी शुभ्र नवलाई, पेंगॉन्ग आणि त्सोमोरिरीची गूढरम्य गहिरी जादूभरी मोहिनी अशा सगळ्या तुडुंब भरून वाहतील अशा, मनात न सामावणाऱ्या अथांग आठवणी आम्ही कशा जपून, सांभाळून ठेवणार होतो ? त्या रात्री तृप्त-समाधानी होऊन झोपताना आम्हाला सहल संपत आल्याची हुरहूर लागली. दुसऱ्या दिवशी शार्प ९ वाजता आम्हाला त्सिरिंग घ्यायला आला, आमचा प्रेमळ निरोप घेताना तो सुद्धा गहिवरून गेला, त्याच्या सोबत आम्ही फोटो काढून घेतले आणि एअरपोर्टवर त्याचा निरोप घेताना नकळत आमचेही डोळे पाणावले. लेह-लडाख सफरीने आमच्यात भरलेल्या नव्या उत्साहाचा, उमेदींचा ऑक्सिजन तना-मनात भरून घेऊन रिचार्ज-रिफ्रेश होऊन आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. 'न भूतो न भविष्यती' अशी ही संस्मरणीय लेह-लडाख सफर आम्हाला अनेक अर्थांनी समृद्ध करून गेली आणि स्वप्नवत वाटणारी ही साहसी प्रवासगाथा देवदयेने सुफळ संपूर्ण झाली !!! (समाप्त)

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक ६

# मैत्रीचा सुवर्ण महोत्सव

- सौ. अरुणा अरुण भिडे, नाशिक.
९४२०८२७८२६




अरविंद गं. हायस्कूल, जोगेश्वरी, मुंबई येथील शाळेचे १९६६ सालच्या अकरावी एसएससी बॅचचे आम्ही विद्यार्थी-विद्यार्थिनी. दि. ११ डिसेंबर २०१६ रोजी ५० व्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आमच्याच बॅचचा मित्र डॉ. भानजी याच्या मढ येथील बंगल्यावर एकत्र आलो. स्नेहभेटीचा हा सोहळा आम्ही दणक्यात साजरा केला. खरं म्हणजे आम्ही सारे १९६६ नंतर १६ नोव्हेंबर २०११ ला ४५ वर्षांनी प्रथम भेटलो. इंटरनेट, फेसबुक, गुगलच्या माध्यमाने आम्हा सर्वांना एकत्र आणण्याचे काम परदेशस्थ मित्र विलास प्रधान, प्रदीप कुलकर्णी यांनी महाराष्ट्रात असलेल्या पण विविध ठिकाणी स्थायीक झालेल्या अरुण विजयकर, रमेश वारंगे, डॉ. भानजी, सौ. अरुणा भिडे यांनी केले. जवळजवळ ४८ मित्रमैत्रिणींना एकत्र आणलं. अशा या भेटीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात ७ फेब्रुवारी २०१६ रोजी स्नेहमेळाव्याच्या आयोजनाने करण्यात आली होती. अमेरिका, दुबई, अलिबाग, रत्नागिरी, गोवा, नाशिक येथे वास्तव्यास असलेले मित्रमैत्रिणी उपस्थित राहून उत्साहाने या मेळाव्यात सहभागी झाले होते. यावेळी भला मोठा केक कापून सुवर्ण वर्ष भेटीचा आनंद द्विगुणित करण्यात आला. तसेच या दिवसाची आठवण म्हणून एसएससीच्या निरोप समारंभाच्यावेळी काढलेला ग्रुप फोटो कॉफीमगवर प्रिंट करून प्रत्येकाला देण्यात आला.

त्याच उत्साहाने आणि एका अनामिक ओढीने ११ डिसेंबर १६ रोजी पुन्हा सर्वजण एकत्र येऊन 'आनंद सोहळा' साजरा केला. निसर्गरम्य वातावरणात असलेल्या ठिकाणी अनामिक ओढीने एकत्र आलेल्या सर्व मित्रमैत्रिणींचा आनंद वर्णन करता येणार नाही. आनंद सोहळ्याच्या सुरुवातीला, मिळालेल्या माहितीनुसार ज्या मित्रमैत्रिणींचे देहावसान झाले अशांना श्रद्धांजली वाहण्यात आली. वर्ग सुरू होण्यापूर्वी शाळेत म्हणत असू ती 'सरस्वती वंदन' प्रार्थना म्हणण्यात आली. यानंतर प्रथम सर्वांनी आपली ओळख करून दिली. त्यात अनेकांनी आपल्या गत आयुष्यातील घडलेल्या घटना-आठवणी सांगितल्या. शिक्षकांसोबतचे किस्से, स्वतः केलेल्या खोड्यांमुळे शिक्षकांनी केलेल्या शिक्षा, त्यांचे मार्गदर्शन, वर्गातील गमतीजमती सांगताना नकळत पन्नास वर्षे मागे गेल्याचा भास व आनंद मिळत होता. बोंद्रे सर, पेंडभाजे सर, सुळे मॅडम, देसाई मॅडम, करंडे मॅडम, गावस्कर मॅडम, महाले मॅडम, वाघ मॅडम, माईणकर सर अशा सर्व शिक्षकांच्या आठवणींनी सर्व हेलावून गेले. गप्पांच्या ओघात सुरुवातीचे दोन तास कसे निघून गेले समजलेच नाही. यानंतर सुग्रास भोजनाचा लाभ सर्वांनी घेतला. नंतरच्या सत्रात विविध खेळ खेळण्याचा आनंदही घेण्यात आला. यावेळी मित्र रमेश वारंगे याने साकारलेली 'स्मरणिका' प्रकाशित करण्यात आली. या स्मरणिकेचे विशेष हे की सर्व मित्रांचे पन्नास वर्षांपूर्वीचे शालेय फोटो, आत्ताचे फोटो, सर्वांची माहिती, जन्मतारखा, पत्ते, संपर्क क्रमांक यात छापण्यात आले आहेत. ज्यामुळे ही मैत्री अखंड तेवत राहणार आहे. हा असा प्रयोग प्रथमच आमच्या एसएससी बॅचने केला असावा. याचा अभिमान वाटतो. अरुण विजयकर याने एक इमेल अकाऊंट सर्वांसाठी खुला केला आहे. तसेच दिवाकर राव या मित्राने व्हॉटस् ग्रुप स्थापन केलाय. त्यामुळे मैत्रीचे बंध दृढ व्हायला मदत होत आहे. सर्व मित्रमैत्रिणींच्या सहभागातून काही रक्कम शाळेसाठी जमविण्यात येत आहे. या सर्वात महत्त्वाचे म्हणजे पुन्हापुन्हा एकत्र येणे, मैत्रीची जपणूक करणे, अडीअडचणीचा काळ व आनंदाचा काळ दोन्हीत मैत्री ओलाव्याची छान साथ मिळावी हा प्रयत्न असणार आहे. एक सुंदर 'सपोर्टग्रुप' तयार होणार आहे. आज सर्वजण वयाची सासष्ठी पार केलेले आहेत. यापुढे दरवर्षी एकदातरी सर्वांनी एकत्र जमण्याचे ठरविले आहे. जोडीला व्हॉटसूअप, इमेल, फोन तर 'टॉनिक' म्हणून आहेच. एकूण काय 'आनंदाचे डोही आनंद तरंग !' एजीएचएस १९६६, हिप हिप हुर्रे... हिप हिप हुर्रे...

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक ७

# पवित्र बंधन

- श्यामकांत बाळकृष्ण भिडे, पुणे
मो. ९५६१८३२८२३



मी सन १९९१ च्या ऑगस्ट महिन्यात केंद्रीय सरकारच्या सेवेतून निवृत्त झालो. माझ्या मुलांचे आता लग्न व्हावे असे आम्हा उभयतांना वाटत होते, त्यानुसार मी मुलींची स्थळे पाहण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे ह्या संस्थेचे वधू-वर मंडळ सदाशिव पेठेत आहे. हे कळल्यावर मी तेथे मुलींची स्थळे पाहण्यास गेलो व मुलाचे नाव नोंदविले. एक दिवस स्थळे पाहताना संघाचे कार्यवाह, राजाभाऊ लिमये यांची ओळख झाली. माझी माहिती विचारून त्यांनी संघात काम करण्यास येणे शक्य होईल का ? असे विचारले. जरा वेळ मी विचार करून त्यांना होकार दिला. त्याप्रमाणे दुसरे दिवशी म्हणजे दि. २० सप्टेंबर, १९९१ रोजी माझी संघात नियुक्ती झाली. त्यावेळी संघाचे कार्यालयात काम करण्यासाठी एक महिला कर्मचारी व वधू-वर मंडळात काम करण्यासाठी एक पुरुष कर्मचारी होते. माझ्या कामाचे स्वरूप कार्यवाह यांनी मला समजावून सांगितले. बँकांची सर्व कामे करणे, षण्मासिक व वार्षिक सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त लिहिणे व बाहेरची सर्व कामे करणे इत्यादी कामांचे स्वरूप होते.

दि. २३ डिसेंबर, १९३३ हा संघाचा स्थापना दिवस. दि. २३ डिसेंबर २००७ रोजी संघाला ७५ वर्षे पूर्ण होणार होती. ह्या दिवसाचे औचित्य साधून, चित्पावन ब्राह्मण समाजाचे जागतिक संमेलन पुण्यात घ्यावे असा प्रस्ताव त्या वेळचे कार्यवाह मा. श्री. अशोकराव वझे यांनी प्रथम कार्यकारी

मंडळाच्या मासिक सभेत ठराव मांडला व तो एकमताने मंजूर झाला. त्यांचे संमतीने हा प्रस्ताव जनरल बॉडीपुढे ठराव म्हणून मांडण्यात आला, तोही एकमताने मंजूर होऊन त्याप्रमाणे चित्पावन ब्राह्मण समाजाचे जागतिक संमेलन पुणे येथे दोन दिवस घ्यावे, असा ठराव पास झाला. पुढे परदेशस्थ चित्पावन ब्राह्मण मंडळींचां या संमेलनाला भरघोस पाठिंबा मिळाला व त्यांनी स्वतः काम करण्याची तयारीही दर्शवली. संमेलनाचे काम करण्यास त्यावेळचा स्टाफ कमी आहे असे वाटल्यामुळे कार्यवाह यांनी संमेलनाचे काम करण्यासाठी दोन महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. या निवडलेल्या दोन महिलांपैकी सौ. साक्षी ओक ह्यांची नियुक्ती झाली होती. संघाच्या कामात काही अडचण आल्यास इतर स्टाफला विचारून काम करावे असे तिला सांगितले होते. तिच्या कामाचे स्वरूप तिला सांगण्यात आले होते. आता तिला कामाचे स्वरूप समजल्यामुळे त्या प्रमाणे ती काम करू लागली. माझ्याबरोबर काम करताना सौ. साक्षी हिची इंटरेस्ट घेऊन काम करण्याची पद्धत, रेकॉर्ड पद्धतशीरपणे विषयानुसार ‘अप डेट’ ठेवणे, टायपिंग इत्यादी, शिवाय तिचे सुवाच्च वळणदार सुंदर अक्षर हे सर्व करत असता वागण्यातली व बोलण्यातली शालीनता, सौजन्य, तिच्यातील असलेल्या अंगीकृत दैवी सद्गुणांची मला पारख झाली. तिच्याविषयी माझा आदरभाव वाढला. पुढे दोन महिन्यांत आमची जवळीक येऊन, स्नेह जडला. आमच्या मैत्रीचे रूपांतर स्नेहबंधनात झाले. आमच्यामध्ये बापलेकीचे पवित्र व दृढविश्वासाचे मजबूत नाते जोडले गेले आणि ह्या नात्याला तिने उत्तम प्रतिसाद दिला. मला मुलगी नसल्यामुळे मी दुःखी कष्टी होतो. ही उणीव साक्षीने भरून काढली. मला वडिलांचा दर्जा दिला व स्वतःच्या कुटुंबात समाविष्ट करून घेतले. हा तिचा थोरपणा मी पुरेपूर जाणून आहे. ‘भाऊ-बहीण, काका, मामा, आजी, आजोबा इत्यादी कौटुंबिक रक्ताची नैसर्गिक नाती असतातच, ती आपल्याला जन्मतःच प्राप्त होतात. पण काही नाती कौटुंबिक नैसर्गिक रक्ताची नसतात. आपल्या आयुष्यात ती आपल्याला निःस्वार्थपणे जुळवावी लागतात. ह्यासाठी दृढविश्वास, पवित्र आदरयुक्त श्रद्धा असावी लागते. दोन व्यक्तींमधील बंध भक्कम होण्यासाठी भावनांची व विचारांची देवाण-घेवाण व्हावी लागते. तरच मने जुळून ती निकोप होतात. अशा प्रेमाने श्रद्धेने व सद्भावनेने जोडलेली सात्त्विक नाती जोपासली जातात व अशी जोपासलेली नाती अजरामर होऊन जातात. आपल्याला सदैव आनंद देतात, हे त्रिवार सत्य आहे. सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्यात सातत्य राहते व परस्पर दृढ नातेसंबंध प्रस्थापित होतात, पुष्ट होतात. ह्याचा अनुभव मी घेत आहे व आनंद लुटत आहे. मी राहात होतो त्या श्रीकृष्ण सोसायटी, पटवर्धन बाग, एरंडवणा येथे माझ्या शेजारच्याच ब्लॉकमध्ये श्री. प्रमोदराव दातार व त्यांची सुविद्य पत्नी सौ. संजीवनी व दोन लहान मुले, यांचे चौकोनी कुटुंब राहात होते. शेजारीच असल्यामुळे येणे-जाणे, क्वचित प्रसंगी एकत्र भोजन करणे असे घरगुती संबंध नकळत जोडले गेले. ऋणानुबंध वाढले. निःस्वार्थीपणे व निर्मळ मनाने जोडलेले हे अनैसर्गिक नाते दिवसेंदिवस जोपासले गेले व दृढ झाले. त्याचा आनंद मी सतत आजपर्यंत उपभोगत आहे. अहो नाते काय आणि फुले काय जशी फुलवावी तशी ती फुलतात, सुगंध देतात. नाती अमर होतात व त्याचाच आनंद आपल्याला मनस्वी होतो. आणखी काय पाहिजे ?

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक ८**

# एका ट्रिपची गोष्ट

**- श्रीपाद श्रीकांत भिडे**
९४२३५९१३४०



ट्रीप अर्थात सहल मग ती शैक्षणिक असो अथवा धार्मिक, स्वदेशात असो वा विदेशात, त्या प्रवासातून आपण काही नवीन अनुभव शिकलो नाही तरच नवल ! नाही का ? रोजच्या धकाधकीच्या जीवनातून काही क्षण आनंदाने व्यतीत करण्यासाठी केलेला छोटासा प्रयत्न म्हणजे सहल. परंतु काही प्रवास ठरावीक प्रसंगांमुळे आयुष्यात कायम आठवणीत राहतात. तसाच आमचा कुर्गचा प्रवास. २०१९ ची दिवाळी. ऐन दिवळीतच कुर्ग ह्या थंड हवेच्या ठिकाणी जायचे म्हणून आम्ही चौघं खूपच आनंदात होतो. जायचे ठिकाण नवीन असल्याने काय काय पाहायचे, काय वगळायचे, काठे कसे जायचे, ह्याचा तपशील डोक्यात घट्ट होता. शुक्रवार २५ ऑक्टोबर धनत्रयोदशी. तो दिवस सगळा गडबडीतच गेला. कारण आमचा दिवाळी पाडव्याला ‘दिवाळी पहाट’ कार्यक्रम होता. गाण्यांचा शनिवारची संध्याकाळ. माझा भ्रमणध्वनी अचानक बंद. काही केल्या सुरू होईना. डोळ्यांसमोर दिवाळीच्या पणत्या नव्हे तर हजारो काजवे चमकायला लागले. रेल्वे, हॉटेल आरक्षण, सगळे संदर्भ सारंच त्यात एकवटलं होतं. ऐन दिवाळीत दुरुस्ती अशक्य. त्यातून दुरुस्त झालाच तर परत बंद पडणार नाही ह्याची शाश्वती ती काय ? म्हणून दुरुस्ती पर्याय लांब ठेवला. इथेच पहिला अनुभव आला. आपण अशा इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या इतके अधीन आहोत की ती कधीही बंद पडू शकते हे पार विसरलो आहोत. आपली पारंपरिक टिपणाची पद्धतच योग्य वाटू लागली. कारण ऐन दिवाळीत वेळ साधून साहेबांनी आपली लायकी दाखवून दिली होती. हॉटेलचे आरक्षण एका कार्ड कंपनीद्वारे झाले होते व म्हैसूर ते कुर्ग आणि पुन्हा म्हैसूर हे माझ्या एका विद्यार्थिनीने ठरविले असल्याने मी कुठेच प्रत्यक्षात सहभागी नव्हतो. पूर्णपणे परस्वाधीन. प्रथमतः त्या विद्यार्थिनीचा नंबर मिळवणे क्रमप्राप्त होते. रात्रीच मित्राचे घर गाठले आणि त्याच्या पुन्हा भ्रमणध्वनीवरच (?) माझे व्हार्टसॲपचे अकाऊंट सुरू केले. नंबर दिसायला लागले पण पाहिजे तो नंबर हुडकणार कसा ? म्हणून डीपी पाहायला सुरुवात केली. नशिबाने एका नंबरला माझ्या विद्यार्थ्याचा फोटो दिसला. लगेचच फिरवला. कर्मधर्म संयोगाने मला हवी असणारी विद्यार्थिनी त्याचीच वर्गमैत्रीण निघाली. माझं पहिलं लक्ष्य पार पडलं. माझ्या रेल्वेतल्या मित्राकडून आमच्या पीआरएनची स्थिती जाणून घेतली. एव्हाना ते वेटिंगचे क्लिअर झाले होते. दुसरं लक्ष्य पार.

भाऊबीजेच्या दिवशी आमचा सोलापूरसाठी प्रवास सुरू झाला. कारण सोलापूर ते म्हैसूर असे आरक्षण होतं. पण अजूनही तिसरे लक्ष्य अपुरेच

होते. हॉटेल कोणते आरक्षित आहे हे जाणून घेण्याचे. सोलापूरच्या प्रवासात हजारदा कार्ड कंपनीचा नंबर फिरवून झाला होता. भाऊबीजेच्या दिवशी फोन उचलण्याची भाऊबीज मला कोण घालणार होतं माहीत नव्हतं. संत ज्ञानेश्वर चित्रपटातील एका गाण्याची ओळ मनात रुंजी घालत होती. 'जिसका ना कोई सगी साथी ईश्वर है रखवाला' माझीही तशीच अवस्था. पण खरोखरच ह्या काव्यपंक्तींची प्रचितीही लगेचच आली. माझं ढिगभर कॉल पाहून एका व्यक्तीने माझा फोन उचलला आणि मला आशेचा किरण दिसला. बसच्या प्रचंड आवाजात सुद्धा मला स्पष्ट ऐकू येत होतं. कारण माझे प्राण कानात एकवटले होते. 'कई बार आप फोन कर चुके है ! क्या मैं आपकी कुछ साहयता कर सकता हूँ ?' मनात म्हटले 'अरे बाबा तूच काही करू शकतोस.' 'सुलोका टॉवर' हे हॉटेलचे नाव सोडून सगळे टॉवर सांगून झाले पण संदर्भ काही लागेना. शेवटी तोही मिळाला आणि सोलापूर यायच्या आत तिसरं लक्ष्यही पार पडलं. पुन्हा पहिल्या उत्साहात आमचा सोलापूर-म्हैसूर-कुर्ग असा प्रवास पार पडला आणि 'सुलोका टॉवर' ह्या आरक्षित हॉटेलात आम्ही दाखल झालो. पण अजूनही आमची थोडी परीक्षा बाकी होतीच. मॅनेजरसाहेब म्हणाले आपले आरक्षणच नाही. कार्ड कंपनीने ओयोच्या साहाय्याने आरक्षण केलेले होते. पण ओयो हॉटेल व्यावसायिकांना पैसेच देत नाहीत हा मला आलेला दुसरा अनुभव होता. पुन्हा फोनाफोनी सुरू झाली. ती पण परीक्षा उत्तीर्ण आणि त्याच हॉटेलात स्थिरावलो. रोजच्या धकाधकीतून चार सुखाचे क्षण अनुभवायला जाण्यासाठी पुन्हा धकाधकच. पोटात गोळाच येतो. पण त्याचीही मजा वाटायला लागते, पण नंतर. अशा बिकट प्रसंगी शांततेने, विचारपूर्वक आणि योग्य दिशेने पावले पडली की भाऊबीज नक्की मिळते हा माझा अनुभव !

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक ९**

# शेजारी

**- सौ. विद्या भिडे, पुणे**
मो. ९४२०८६४४१३



आजकाल सर्वत्र गगनचुंबी इमारती असतात आणि आपल्याला शेकडो शेजारी असतात. लिफ्टमधून जाता येता गुड मॉर्निंग वगैरे बोलतात आणि आपल्या फ्लॅटमध्ये निघून जातात. शेजाऱ्याची अंतरंगी ओळख कधीच होत नाही. मनातले कोणीच बोलत नाही. त्या मानाने गरिबांना शेजार व शेजारधर्मही बऱ्यापैकी असतो. चांगला शेजार मिळणे योगायोगाचाही भाग आहे. मी माझ्या लहानपणीच्या शेजाऱ्यांचा अनुभव सांगणार आहे. आमचे कुटुंब 'सत्पुरुषांच्या सांगाती' राहात होते. शेजारी म्हणण्यापेक्षा त्यांना देव माणूस म्हणता येईल. आम्ही सातारला भटजी महाराज मठात राहात होतो. त्या ठिकाणी वेदशास्त्र संपन्न मारुतीबुवा बापट, मठाधिपती यांच्या शेजारी राहण्याचे भाग्य लाभले. मारुतीबुआंना आम्ही मठातील सर्व मंडळी दादा म्हणत असू. ते मठातल्या देवांची पूजा आणि भिक्षुकी करीत व माझे वडीलही भिक्षुकी करीत असत. त्यामुळे घरमालक व भाडेकरू संबंध नव्हता तर एखाद्या ऋषींच्या आश्रमात आपण राहात आहोत असा भास होई. सत्संगतिः किं न करोति पुंसाम् ? याचा नित्य नवा अनुभव मिळत असे. पितृतुल्य नात्याने त्यांच्याशी आमचा व्यवहार होई. अभ्यासाला पहाटे उठवा असे त्यांना सांगितले की पहाटे हाका मारणारच. एकमेकांच्या घरी जाण्यास परवानगी लागत नव्हती कारण दिवसभर दारे उघडीच असायची. सेल्फ किंवा सेल्फ कंटेन्ड असे शब्दच माहीत नव्हते. शेजारी म्हणून अनुभव ऐकाल तर चाट पडाल. माझ्या वडिलांची १९७० मध्ये कृष्ण यजुर्वेद शिकवण्यासाठी नियुक्ती झाली. त्यावेळी ती. दादांनी मठातील ५ खणी माडी फक्त रु. ५ वीज भाडे घेऊन १५ वर्षे मुदतीसाठी दिली. मठात वेद शिकवण्याचे केंद्र निघाले म्हणून त्यांना परमानंद झाला. ते अभ्यासू होते. ग्रंथ वाचन, मार्गदर्शन तसेच संधा घेण्यासही येत होते. आता दुसरा अनुभव सांगते. १९९० मध्ये आमच्याकडे गाय आणायचे ठरले. मठात गोठा करायला त्यांनी परवानगी दिली. गाय म्हटले की वासरे, शेण, खत, गोवऱ्या थापणे व त्या साठवणे एवढी जागा कोणता घरमालक देईल ? इतर भाडेकरू तक्रार करीत पण ते म्हणायचे तुम्ही माझ्या घरात गुरे बांधली तरी माझी हरकत नाही. असा शेजारी कोणाला भेटलाय का ? आजकाल शेजाऱ्याकडे ५ मिनिटे सुद्धा भरवशाने कोणी मुले ठेऊ शकत नाही. पण आम्ही मुले या शेजाऱ्यांच्या बरोबर त्यांच्या मुलामुलींकडे जाऊन राहिलो व मुंबई सुद्धा बघितली. 'सुसंगती सदा घडो' हा आमच्यासाठी रोजचा अनुभव होता. ती. दादा भक्ती आणि ज्ञानाचा सागर होते पण घर फक्त भक्ती व ज्ञानावर चालत नाही तर त्यासाठी पैशाची आवश्यकता असते. ते रोज दुपारी ४ वाजता पुराण सांगायचे. पुराण ऐकायला ३ श्रोते असत व ते घरी जाताना देवापुढे एक एक मूठ तांदूळ ठेवीत त्या घरातला भात होई. तरीही समाधानी, अधिक मिळावे ही अपेक्षा नव्हती. मिळालेली धोतरे आणि बाराबंदी एवढा साधा पोशाख असला तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व असे की त्यांच्या पाया पडावे. त्यांची बायको आनंदीबाई, नावा प्रमाणेच आनंदी होत्या. सर्व लोक त्यांना 'मठकरीण बाई' म्हणत. त्यांचा सर्वांना दरारा होता. पण आमच्याशी त्यांचे काय ऋणानुबंध होते माहीत नाही. फक्त प्रेमाचे नाते होते. बागेत फुले तोडलीकी मला देत. विद्या ही घे तुला असे म्हणत. त्यांना कोणी कोणी साडी पण देत. पण त्याची घडी मोडायला मला देत. मी देखील नऊवारी साडी नेसून मिरवत असे. संपूर्ण मठाची स्वच्छता व देव पूजा दोघे आनंदाने करीत. वैराग्य, दांभिकपणा नसणे आणि कमीत कमी गरजा ठेवणे असे असंख्य गुण त्यांच्यात होते. त्यांच्या सान्निध्यात राहून थोडातरी परिणाम आपल्यावर होतच असतो. त्यांची मुंबईतील मुलेबाळे, नातवंडे सुट्टीत सातारला यायची. आमची त्यांच्याशी मैत्री जमायची. पूर्वी सर्वच शेजारी एकमेकांना मदत करीत असत. पाहुणे आले म्हणजे कपबशा, उषा, पांघरुणे, स्वयंपाकात देवघेव करीत पण त्यांच्यासारखे शेजारी दुर्मिळ ! आठवणींचे भांडार खूपच आहे. पण अशा दुर्मिळ लोकांचे मोठेपण उशिरा कळते हेच खरे. आजकाल पावलोपावली थँक्सचा भडिमार असतो. पण अशा तपस्वी, मनस्वी शेजाऱ्याला किती धन्यवाद द्यायला हवेत ? ह्या लेखाच्या निमित्ताने त्यांचे पुण्य स्मरण करण्याची संधी मिळाली. ज्यांना केवळ शेजारी न म्हणता 'परीस' म्हणावे असे वाटते, ज्यांनी गोडबोले कुटुंबाचे सोने करून टाकले. परोपकाराय फलन्ति वृक्षाः। परोपकारायमिदं शरीरम्॥ असेच ह्या देव माणसांचे वर्णन योग्य होईल व हीच माझ्यातर्फे माझ्या शेजाऱ्यांची एक आठवण.

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक १०

# जोडलेली नाती - अनमोल मोती

-सौ. मनिषा मोरेश्वर भिडे, पनवेल
मो. ९८१९३९३८३२



मी आणि माझे पती पनवेलला राहतो. जोशी कुटुंबाशी आमचे घट्ट ऋणानुबंध आहेत. आमचे पहिले घर देवधर वाडा. तिथे शेजारच्या जोशीमामी आमच्या अडीअडचणीला धावून यायच्या. माझ्या सुनबाई समजून लाड पुरवायच्या. आमच्या कुटुंबावर लक्ष ठेवून सांभाळ करायच्या. आमचे दुसरे घर मुंबईकर चाळ. तिथे राहात असताना सौ. सुनिता जोशी यांच्या कुटुंबाशी स्नेहबंध जुळला. जोशी काका-काकूंना मी दीर-जाऊ मानले. जोशी काका-काकू आम्हाला सुखदुःखात, सणसमारंभात, धार्मिक कार्यात मदत करायच्या. आमचे लाडही करायच्या. लाडू, वड्या, लोणचे, खरवस किंवा विशेष पदार्थ केल्यास आठवणीने पाठवायच्या. आमचे तिसरे घर 'नवांकूर सोसायटीमधील. शेजारी माझी जोडलेली सून सौ. कल्पना जोशी-फासे. आम्ही हळदीकुंकू, लग्न, मुंज समारंभात एकमेकांचे घर वापरतो. अडीअडचणीत मदत करतो. आमचे चौथे घर श्री. मंगल जोशींचे घर. जोशी व माझे पती जिवलग मित्र. एका ऑफिसमध्ये एकाच विभागात काम करायचे. आमच्या घरातील सुखदुःखाच्या प्रसंगात, सणसमारंभाच्या वेळी, धार्मिक कार्यात त्यांचा सहभाग, सल्ला व मदत असतेच. माझ्या महिला मंडळातील सखी, दोन जोशी, फोन केल्यावर मदतीला येतात. नोकरीत असताना कामात काही अडले तर जोशी आडनावाच्या मैत्रिणी मदत करायच्या. माझ्या पतींना नागीण झाली होती, तसेच पोटाची ऑपरेशन्स झाली. त्यावेळी शेजारचे कुळकर्णी, जोशी कुटुंबीय आमच्या मानलेल्या मुली सौ. गीता दीक्षित, मानसी गाडगीळ, दोघींचे पती, पुतणे, नातू यांची खूपच मदत झाली. मला जेवणाचा डबा, ह्यांना पथ्याचा डबा पाठवला. दिवसभर हॉस्पिटलमध्ये बसण्याच्या वेळा सांभाळल्या. ॲडमिट करण्यापासून ते डिस्चार्ज मिळेपर्यंत सर्व काही सांभाळले. दुर्दैवाने आम्हाला अपत्य नाही. तसेच रक्ताचे नाते असलेले कोणीही नातेवाईक पनवेलमध्ये नाहीत. तरीसुद्धा वरील सर्व कुटुंबांचा आमच्याशी घनिष्ठ संबंध आल्याने त्यांची, तसेच आमच्या गल्लीतील, सोसायटीतील मुले लहानपणापासून आमच्या घरी खेळायला, राहावयास येतात. आजी असूनही लहान होऊन मी त्यांच्यामध्ये पत्ते, कॅरम, भेंड्या इत्यादी खेळते. त्यांना खाऊ देते, संस्कार घडवते. त्यात मला मानसिक आनंद मिळतो. त्या मुलांनी मला जीव लावलाय, मी त्यांना प्रेम देते. आमची मुलांची उणीव ह्या मुलांनी भरून काढलीय. अशीही आमची 'जोडलेली नातीगोती' रक्ताच्या नात्यांपेक्षा सुद्धा मायेची, आपुलकीची वाटतात. ही जोडलेली 'नातीगोती' म्हणजे 'अनमोल मोतीच' आहेत. ती जपण्यासाठी मी आयुष्यभर प्रयत्न करीन. त्यांना माझा शतशः प्रणाम.

लेखन स्पर्धा - २०२१
लेखांक क्रमाक ११

# प्रॉपर्टी व्हॅल्यूअर : स्टार्टअप

- अविनाश भिडे
मो. ९८२३०५१९८१



एकदा माझ्या मित्राने मला विचारले की तुला बिनभांडवली उद्योग किंवा धंदा करायचा आहे का ? हा माझी काहीतरी फिरकी घेत आहे अशा नजरेने त्याच्याकडे पाहताच तो पुढे म्हणाला, 'अरे, गव्हर्नमेंट ॲप्रुव्हड व्हॅल्यूअर म्हणून तू इन्कम टॅक्स डिपार्टमेंटकडून सर्टिफिकेट मिळवून पाच वर्षे झाली आहेत. त्याचा आता तरी उपयोग कर. नाहीतर नोकरीतच गुंतून पडशील. माझ्याही डोक्यात स्टार्टअपचे विचार घोळत होते. अशा तऱ्हेने मी प्रॉपर्टी व्हॅल्यूअर बनलो. मात्र त्याकरता एक कॉम्प्युटर, एक प्रिंटर, एक स्कॅनर यांचा बंदोबस्त करायला लागला. तो कसाबसा मॅनेज केला. या क्षेत्रात मी नवीन असल्यामुळे माझ्या एका व्हॅल्यूअर मित्राबरोबर काम केले आणि नंतरच स्वतंत्रपणे प्रॉपर्टी व्हॅल्यूअर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. स्टार्टअपमध्ये सुरुवात करून थोडाफार जम बसताना अनेक खमंग, चांगले, वाईट अनुभव आले. साधारणतः प्रत्येक बँकेचे, ज्या ठिकाणाहून काम मिळते त्यांचे ठरलेले व्हॅल्यूअर त्यांच्या पॅनेलवर असतात. त्यामुळे कोणतीच बँक प्रॉपर्टी व्हॅल्यूअरचे काम देण्यास तयार नव्हती. शेवटचा उपाय म्हणून मी काही बँकांकरिता स्वस्तात व्हॅल्यूएशन रिपोर्ट करून दिले. परंतु खरा प्रश्न पुढेच आला. मी व्हॅल्यूएशनचे काम माझ्या स्वभावामुळे एक प्रोफेशनल म्हणून करत होतो त्यामुळे बँकेचे लोक आणि प्रॉपर्टीचा मालक असे दोघेही माझ्यावर थोडेसे नाराज होते. परंतु ते बोलून मात्र दाखवत नव्हते. त्यामुळे काम कमी मिळत होते. आपण उगीचच या स्टार्टअपच्या फंदात पडलो असा विचार मनात येऊ लागला होता. परत नोकरी करावी असे वाटू लागले होते. शेवटी एका अनुभवी व्हॅल्यूअरने मला सांगितले की एक प्रोफेशन असे न म्हणता तू एक बिझनेसमन आहेस असे समजून कर. नाही तर तुझे काही खरे नाही. त्याचबरोबर बिझनेस याचा अर्थही मला नीटपणे अनेक उदाहरणे देऊन समजावून सांगितला. तेव्हापासून मला प्रोफेशनल आणि बिझनेसमन यामधील तारेवरची कसरत करायला लागत होती. त्यामुळे काहीतरी काम मिळत होते. तरीपण मी त्यावर स्वस्थ न बसता मार्केटींगचे अनेक प्रयोग केले. कारण संपूर्णपणे बिझनेसमन बनणे म्हणजे ज्या कस्टमरला हवे असतील तसे व्हॅल्यूएशन रिपोर्ट बनवून देणे. ते सुद्धा प्रॉपर्टी व्हॅल्यूएशनचे नियम पाळून जे मला शक्य होत नव्हते. प्रयोग म्हणजे टेलिफोन, डिरेक्टरीमधून आणि प्रत्येक बँकेमध्ये जाऊन त्यांच्या निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या शाखांची माहिती मिळवणे. अशा तऱ्हेने जवळजवळ पुणे आणि आसपासच्या ५०० बँकांना भेटी दिल्या. पुण्यातले एक व्हॅल्यूअर पुण्यापासून पन्नास-साठ मैलावर असलेल्या बँकेमध्ये येतो याचे त्यांना फार अप्रूप वाटते. त्यांची कामे मिळत गेली. अनेक कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी बोलल्यानंतर ज्यांना

खरोखर प्रोफेशनल काम पाहिजे होते त्यांची कामे मिळायला लागली. थोडक्यात काय, 'ओरडणाऱ्याचाच माल खपतो' ही म्हण लक्षात ठेवली होती. मात्र काम करताना बरेच फटके बसले. उदा. व्हॅल्यूएशन रिपोर्टबरोबर बिल देऊनसुद्धा पैसे बुडणे. कस्टमरने जरूर ती ओरिजिनल कागदपत्रे न दाखवता फक्त झेरॉक्स दाखविणे, शेजारच्या वर्कशॉपमधील काही मशिनरी आपली म्हणून दाखवणे, ज्या फ्लॅटचे व्हॅल्यूएशन करायचे होते त्याऐवजी दुसराच फ्लॅट दाखविणे त्याच्या प्रॉपर्टीच्या आसपास काय प्रॉपर्टी रेट चालला आहे याची मुद्दाम चुकीची माहिती देणे. परंतु या सगळ्या अडचणींना तोंड देऊन मी पुरून उरलो. हळूहळू बँकेतल्या अनेक साहेबांना पटले की त्यांच्या कस्टमरला देण्यात येणारे लोक मागून वसूल करण्यात अडचणी येऊ नयेत म्हणून प्रोफेशनल कामच असणे जरूर आहे. शेवटी प्रामाणिकपणाची कास ठेवून बरेच काही करता येते याची खात्री मलाही पटली.

---

**लेखन स्पर्धा - २०२१**
**लेखांक क्रमाक १२**

# आठवणीतला प्रवास

**- कौस्तुभ भिडे, डोंबिवली**
फोन : ९८६९१७६९९३



माझा अत्यंत जवळचा असा मित्र निलेश तटकरी सोबत खूप दिवस प्लॅनिंग चालू होतं. कुठेतरी जाऊ.. एक दिवसाच्या ट्रीप मारून कंटाळा आला. अब बडा हाथ मारते है.. आणि शेवटी ती वेळ नोव्हेंबर २०१९ मध्ये आली. आम्हा दोघांनाही ऑफिसला गुरुवार-शुक्रवार अशी सुट्टी मिळाली होती आणि त्याला जोडून शनिवार-रविवारची साप्ताहिक सुट्टी. म्हटलं तेव्हाच बार उडवून देऊ.

एस.टी. महामंडळाच्या आवडेल तिथे प्रवास या योजनेअंतर्गत चार-सात दिवसांसाठी पास मिळतो. महामंडळाच्या विविध सेवेसाठी पासेस उपलब्ध असतात. जसं की साध्या गाडीचा पास, हिरकणी (सेमी लक्झरी), शिवशाही, शिवशाही स्लीपर आणि नुकत्याच नव्याने दाखल झालेल्या सिटर स्लिपर असे पास आपण काढू शकतो. हा पास निम्न दर्जाच्या गाड्यांसाठी पण लागू असतो. उदा. जर आपण शिवशाहीचा पास काढला तर आपण इतर कोणत्याही गाडीतून प्रवास करू शकतो कारण शिवशाही ही सर्वात वरचा क्लास आहे. त्यामुळे साधी गाडी, सेमी लक्झरी अशा कोणत्याही गाडीला चालू शकतो. म्हणून आम्ही शिवशाहीचा पास काढण्याचे ठरवले. ह्या पासची किंमत १,२०५ इतकी आहे. या विषयीची बाकी माहिती तुम्हाला महामंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर मिळेलच. निलेशने कुंभार्ली घाट (चिपळूण ते पाटणमध्ये असणारा घाट) मधून प्रवास केला नव्हता म्हणून तो म्हणाला की त्या मार्गे प्लॅन करू आणि मला बल्लारपूरला जायचं होतं. लगेच रोहित धेंडे भाऊंना (आमचे ठाण्याचे एस.टी.प्रेमी) फोन लावला. त्यांनी आम्हाला चिपळूण-पंढरपूर-बार्शी-आंबेजोगाई-चंद्रपूर-बल्लारपूर-नागपूर-औरंगाबाद-मुंबई असा मस्त प्लॅन सुचवला. सगळं ठरलं होतं. मी अन् निलेश पनवेल डेपोला पास काढायला गेलो. फॉर्म भरायला घेतला. नंतर विचार केला पहिलीच वेळ आहे, उगाच एवढ्या लांब नको. मग कुठे जायचं ? निलेश गुगल मॅपवर ठिकाणं बघत होता अन् मी एस.टीच्या ऑनलाईन रिझर्व्हेशन सिस्टीमवर गाड्या उपलब्ध आहेत का बघत होतो. आम्ही दोघेही केबिनप्रेमी असल्याने आम्हाला पास काढून केबिन सीट रिझर्व्ह करायची होती. जसं म्हटलं निलेशला कुंभार्ली घाटातून प्रवास करायचा होता तसा मला आंबा घाटातून करायचा होता. (रत्नागिरीहून कोल्हापूर मार्गावर असणारा घाट) आणि शिवाय देवरुख आगाराच्या महा २० बी एल ३६१९ या गाडीने देखील करायचा होता जी देवरुख-पुणे या मार्गावर फिक्स असायची. आणि मग मुंबई-औरंगाबाद-कोल्हापूर-साखरपा-देवरुख-पुणे-डोंबिवली असा मार्ग निवडला. आता मुद्दा आला देवरुखला रात्र कुठे काढायची ? कारण आम्ही देवरुखला दुपारी पोचणार होतो आणि ३६१९ देवरुख-पुणे दुसऱ्या दिवशी सकाळी होती. मग आम्ही योगेश फाटक (देवरुखचे एस.टी.प्रेमी) भाऊंना फोन केला. आणि त्यांच्या घरीच माझी राहायची सोय झाली आणि निलेश त्याच्या नातेवाईकांच्या घरी थांबला. पण योगेशभाऊंनी फोनवर एक निराशाजनक गोष्ट सांगितली की ३६१९ ही गाडी डेपोमध्ये नाहीये. पासिंगसाठी गेली आहे. पण त्यांनी हे नाही सांगितलं की त्या जागी विनावातानुकुलित शयन आसनी सुरू झालीये. त्यामुळे साहजिकच माझा थोडा हिरमोड झाला. म्हटलं जाऊदे, आता जे ठरलंय तसंच करू. आणि आम्ही पास काढून रिझर्व्हेशन करून मोकळे झालो. ठरलेल्या दिवशी म्हणजे २८ नोव्हेंबर २०१९ ला आमचा प्रवास सुरू झाला.

मुंबई-औरंगाबाद - वैजापूर आगाराच्या महा २० बी.एल. ३७८२ या सेमी लक्झरीने आमच्या प्रवासाची सुरुवात झाली. सायंकाळी ठीक ५.४५ ला गाडीला स्टार्टर बसला अन आमचा प्रवास सुरू झाला. मुंबई वरून सुटल्यावर कुर्ला, नेहरूनगर मार्गे ठाणे खोपटला येताना अक्षरशः कंटाळा आला. ५.४५ ला सुटलेली गाडी ठाण्याला येईपर्यंत ८.४५-९ वाजलेले, तब्बल ३ तास. पुढे भिवंडीमध्ये पण तीच अवस्था. शेवटी एकदाचं नाशिक हायवेला गाडी टच झाली आणि हायसं वाटलं. आता मस्त पळायला लागली होती गाडी. नुसते ओव्हरटेक. मी पण केबिनमध्ये बसून ओव्हरटेकची मजा घेत होतो. साधारण कसाऱ्याच्या आधी गाडी जेवायला थांबली. आम्ही मस्तपैकी जेवून घेतलं अन् ठरवलं की कसारा घाट रात्रीचा शूट करू. पण गाडीने वेग पकडला आणि गार हवा लागताच आम्हाला केव्हा झोप लागली ते आमचं आम्हालाच कळलं नाही. डायरेक्ट नाशिकच्या आसपास जाग आली आणि गाडी एव्हाना नाशिक महामार्ग बस स्थानकावर आली आणि दोन मिनिटे थांबून लगेच नाशिक मध्यवर्ती बस स्थानकाकडे जायला मार्गस्थ झाली. नाशिक मध्यवर्ती बस स्थानकाला आमच्या गाडीचा क्रू चेंज होता. गाडीचे चालक बदलून नवीन चालकांनी गाडीचा ताबा घेतला. पुढे येवला, वैजापूर करत गाडी पहाटे ५ च्या आसपास औरंगाबादला पोचली. औरंगाबाद मध्यवर्ती बस स्थानक जवळील एका हॉटेलमध्ये आम्ही प्रती तास ह्या हिशोबाने

खोली घेतली अन् फ्रेश झालो. नाष्टा वगैरे करून लगेच बस स्थानकावर बस फॅनिंग (बसचे फोटो काढणे, रा.प. कर्मचाऱ्यांशी गप्पा मारणे अशा अनेक गोष्टी) साठी पोचलो. आमचे ८ वाजताच्या औरंगाबाद वेरूळ लेणी ह्या शिवनेरी बसचे आरक्षण होतेच. ह्या गाडीने मस्तपैकी औरंगाबाद फिरलो. कैलास मंदिर, वेरूळ लेणी, घृष्णेश्वर मंदिर, देवगिरी किल्ला आणि बीबी का मकबरा असं सगळं फिरून संध्याकाळी ५ ला स्टँडवर परत आलो. इथून पुढे आम्हाला कोल्हापूरला जायचे होते. पण कोल्हापूर गाडी ८-८.३० ला होती. एवढा वेळ काय करायचं ? मग पुन्हा गुगल मॅपवर काही प्रेक्षणीय स्थळ आहे का बघायला चालू केलं अन् सीबीएस ला लागूनच सिद्धार्थ गार्डन आणि प्राणी संग्रहालय होते. म्हणतात ना काखेत कळसा अन् गावाला वळसा त्यातली गत झाली. मग काय घुसलो आत. या प्राणिसंग्रहालयात पहिल्यांदाच पांढरा वाघ असा समोर समोर बघितला आणि एकूण बाग फिरण्यात कसा वेळ गेला समजलंच नाही. शिवाय येथे आपल्या मराठवाड्याचा मुक्ती संग्राम यावर आधारित एक म्युझियम देखील आहे. शक्य झाल्यास ह्या म्युझियमला आवर्जून भेट द्या. मग पुन्हा पुढचा प्रवास सुरू झाला. तो औरंगाबाद-कोल्हापूर शिवशाहीने. मुंबई-औरंगाबाद गाडीला जे कंडक्टर होते तेच कोल्हापूर शिवशाहीला सुद्धा होते. त्यांच्याशी आधीच ओळख झालेली असल्याने त्या रात्रीच्या प्रवासात सुद्धा गप्पा रंगल्या. सुरुवातीला केबिनमध्ये मस्तपैकी विराजमान झालो अन् साधारण नगर येईपर्यंत ड्रायव्हर साहेबांसोबत गप्पा गोष्टी करत होतो. नंतर मात्र मी माझ्या सीटवर शिवशाहीच्या गारेगार एसीमध्ये झोपून गेलो तो डायरेक्ट कराडच्या आसपास उठलो. आम्ही साधारण सकाळी ७.३० च्या आसपास कोल्हापूरला पोचलो. कोल्हापूरला सुद्धा स्टँडवरच चहा आणि नाष्टा करून फ्रेश झालो. मस्तपैकी बस फॅनिंग केले. तिसऱ्या दिवशी सकाळी मिरज डेपोच्या मिरज-गणपतीपुळे या गाडीने कोल्हापूर ते साखरपामार्गे मलकापूर-अंबाघाट असा प्रवास करून आम्ही साधारणपणे १२.३०-१ च्या आसपास साखरप्यात उतरलो. तिथून पुढे लांजा डेपोच्या गाडीने साखरपा-देवरुख असा प्रवास झाला. योगेश भाऊंकडे सामान टाकलं. फ्रेश झालो, जेवलो अन् संध्याकाळी मार्लेश्वर मंदिर फिरून आलो. त्या रात्री एक मस्त सरप्राईज माझी वाट बघत होतं. देवरुखला २ वातानुकुलित शयन आसनी बस मिळाल्या होत्या. त्यातली एक ३६१९ च्याच जागी चालत होती अन् दुसरी गाडी नुकतीच दाखल झाली होती. त्याच रात्रीपासून देवरुख-पुणे रातराणीचा शुभारंभ होणार होता. त्या निमित्ताने आम्ही एस.टी.प्रेमींनी नवीन आलेली गाडी मस्तपैकी सजवली आणि नव्या फेरीचा शुभारंभ सोहळा मला अनुभवता आला. दुसऱ्या दिवशी आपल्या नशिबात शयन आसनी गाडी आहे हे समजल्यावर मी तर हवेत उडायचा बाकी राहिलो होतो. त्या रात्री आम्ही देवरुख ते संगमेश्वर असा शयन आसनी गाडीने प्रवास केला. संगमेश्वर स्टँडला मस्त पावभाजी खाऊन अक्कलकोट-संगमेश्वर-देवरुख या गाडीने देवरुखला मुक्कामी परतलो. चौथ्या दिवशी सकाळी आपली देवरुख-पुणे शयन आसनी गाडी वाट बघत होतीच. बरोबर ८ वाजता गाडीला स्टार्टर बसला अन् गाडी पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाली. मी अन् निलेश मात्र स्लीपर बर्थवर झोपायचं सोडून गाडीच्या केबिनमध्ये इंजिनवर बसून प्रवास एन्जॉय करत होतो. संगमेश्वर-चिपळूण-पाटण-सातारा असा प्रवास करत स्वारगेटला आलो. स्वारगेटला आल्यावर एस.टी.स्टँड बाहेरच्या हॉटेलमध्ये नाश्ता केला आणि लगेच ६.३० ची स्वारगेट-कल्याण शिवशाही पकडून परतीचा आणि प्रवासाचा शेवटचा टप्पा सुरू झाला. साधारण रात्री ११.३०-१२ च्या आसपास डोंबिवलीला घरी परतलो.

असा आमचा छोटेखानी चार दिवसांचा प्रवास झाला. माझे मित्र परिवार मला म्हणायचे की चार दिवस फिरून फक्त औरंगाबाद बघून आलास. बाकी नुसता प्रवास केलास. त्यांना काय माहीत आपल्याला नुसतं एस.टी.मधून इकडून तिकडे प्रवास करायला सुद्धा किती मज्जा येते ते ! त्यासाठी कुठल्या प्रेक्षणीय स्थळांची काय गरज ? तुमचं काय मत ?

---

# संगीतकार शंकर-जयकिशन आणि मी

– चंद्रकांत भिडे, दादर
०२२-२४३८०५६०

संगीतकार जयकिशन आणि माझी ओळख पहिल्यांदा १९६३ साली ब्रेबॉर्न स्टेडियमवर इंटर-कॉलेजच्या एका मॅचच्या वेळी झाली. त्याकाळी इंटर कॉलेजच्या मॅचेस खूप गाजायच्या. (अजित वाडेकर, दिलीप सरदेसाई, रमाकांत देसाई, फारूक इंजिनियर असे अनेक जण वेगवेगळ्या कॉलेजेस मधून क्रिकेट खेळायचे. नंतर हे क्रिकेटपटू टेस्ट मॅचेस खेळायला लागले.) त्यावेळी माझ्या बाजूला उभा असलेल्या एकानी मला विचारले, 'कौन खेल रहा है ?' मी त्यांना म्हटलं, 'अजित वाडेकर खेल रहा है ।' तेव्हा ते म्हणाले, 'क्या सॉलिड खेलता है।' मी त्यांना म्हटलं, 'हमारे शिवाजी पार्क का है' मी सहज त्यांच्याकडे बघितलं आणि चाट पडलो. कारण ते होते संगीतकार जयकिशन. ५-६ दिवसांपूर्वीच दादरच्या कोहिनूर थिएटरमध्ये लागोपाठ २ दिवस मॅटिनीला मी राज कपूरचा 'श्री ४२०' चित्रपट बघितला होता. त्यात जयकिशननी छोटीशी भूमिका केली होती. त्यामुळेच त्यांना लगेच ओळखले. मी त्यांना म्हटलं, 'आप म्युझिक डायरेक्टर जयकिशन हो ना ?' तेव्हा ते म्हणाले, 'तुमने मुझे कैसे पेहचाना ?' तेव्हा मी म्हटलं, 'कुछ दिन पहले लगातार दो दिन 'श्री ४२०' फिल्म देखी है उसमे में आपने 'जॉनी' का रोल किया है।' तेव्हा त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला आणि हसले. मी त्यांना म्हटलं, 'मुझे इस फिल्मके डायलॉग्ज और गाने याद है।' जयकिशन बरोबर मी सुद्धा स्टेडियमच्या बाहेर गेटपाशी आलो. मला म्हणाले, 'तुम्हारा नाम क्या है?' मी म्हटलं, 'चंद्रकांत. फ्रेंडस् चंदु-चिना करके बुलाते है।' जयकिशन मला म्हणाले, 'चंदुभाई कुछ सुनाओ' मी त्यांना काही डायलॉग आणि एक गाणं म्हणून दाखवलं. जयकिशनजी माझ्यावर जाम खुश झाले. त्यावेळी माझं वय होतं १७ वर्षं. जयकिशन दिसायला एकदम हॅण्डसम होते. (गमतीचा भाग - त्यावेळी मी सुद्धा हॅण्डसम होतो. भुरे केस,

किंचित चॉकलेटी घारे डोळे, गोरा टिपिकल चित्तपावन.) मला म्हणाले, 'चंदुभाई हॅण्डसम लगते हो.' मी म्हटलं, 'आप तो ज्यादा हॅण्डसम है।' जयकिशनजी मला म्हणाले, 'ये गेलार्ड हॉटेल यहा शामको मैं होता हूँ। मिलते रेहना.' अशा तऱ्हेने आमची पहिली भेट झाली. नंतर खूप वेळा भेटलो. १९६३ सालीच जयकिशनजी माझी ओळख शंकरजींशी करून दिली. तेव्हा ते जयकिशनला म्हणाले, 'अच्छा तो ये है हमारे बेस्ट फॅन.' नोकरी लागल्यावर ऑफिस सुटल्यावर कधी कधी दोघांनाही भेटायचो. हळूहळू भेटीचं रूपांतर चांगल्या ओळखीत झालं. शंकरजी खूप वेळा मला सीसीआय मध्ये चहा प्यायला घेऊन जायचे. मी त्यांना नेहमी त्यांच्या गाण्याबद्दल सांगायचो. ते म्हणायचे, 'चंदुभाई म्युझिकके बारेमे आपको काफी जानकारी है।'

शंकरजींनी त्यांच्या 'दुनिया' फिल्मच्या बॅकग्राऊंड म्युझिकच्या वेळी मला प्रभादेवीला बॉम्बे लॅबमध्ये मुद्दाम बोलावलं होतं. जवळजवळ चार तास मी तिथे होतो. जयकिशन बॅकग्राऊंड म्युझिकमध्ये मास्टर होते. त्यांच्या दोन-तीन गाण्यांच्या रेकॉर्डिंगला मी गेलो होतो. 'मेरे हुजूर' फिल्म मधील 'झनक झनक तोरि बाजे पायलिया' या मन्ना डे यांनी गायलेल्या गाण्याला 'सूर सिंगर अ‍ॅवॉर्ड' मिळालं होतं. त्यावेळी षण्मुखानंद हॉलमधील कार्यक्रमाला जयकिशननी मला बोलावलं होतं. त्यावेळी त्यांच्या बरोबर फोटो काढला.

माझ्या डिपार्टमेंटमधली एक मुलगी जी सिनेपत्रकार होती. तिला एका सिनेमॅगझिनसाठी शंकरजींची मुलाखत घ्यायची होती. ती म्हणाली, तू आधी त्यांच्याशी बोल मग आपण त्यांच्या घरी जाऊ. त्यांनी होकार दिल्यावर रविवारी सचिवालया समोरील बीकॉन बिल्डिंगमध्ये शंकरजींच्या घरी गेलो. आमच्या डिपार्टमेंट मधल्या सिने पत्रकार मुलीशी ओळख करून दिली, तेव्हा शंकरजी म्हणाले, 'कल शाम ५ बजे फेमस स्टुडिओ में मेरे म्युझिक रूममें मिलेंगे, वहाँ इंटरव्ह्यू करेंगे.' शंकरजींच्या हॉलमध्ये एका अर्धवर्तुळाकार टेबलावर सर्व फिल्म फेअर अ‍ॅवॉर्डस् ठेवली होती. मी त्यांना विचारलं, 'चोरी-चोरी फिल्म का अ‍ॅवॉर्ड कौनसा है ?' त्यांनी चोरी-चोरीचं अ‍ॅवॉर्ड माझ्या हातात दिलं. माझ्याबरोबरच्या मुलीने माझा शंकरजींबरोबर फोटो काढला. शंकरजींना गमतीने म्हटलं, 'ये अ‍ॅवॉर्ड लेके जाऊ क्या ?' तेव्हा ते म्हणाले, 'चंदुभाई ये क्या सब लेके जाओ.' चहा झाल्यावर निघताना शंकरजी म्हणाले, 'कल शाम ५ बजे फेमस के गेट पर खडे रहना तबतक मैं आऊंगा.' आम्ही त्यांच्या घरातून बाहेर पडताच शंकरजी म्हणाले, 'चंदुभाई अ‍ॅवॉर्ड नही चाहिए ?' आणि हसायला लागले. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे त्यांच्या म्युझिक रूममध्ये जवळ जवळ ३ तास इंटरव्ह्यू झाला. इंटरव्ह्यू झाल्यावर शंकरजींना यांनी स्वरबद्ध केलेल्या दोन गाण्यांचा मुखडा आणि एक कडवं म्हणून दाखवलं तेव्हा त्यांनी स्वतः पेटी वाजवून मला साथ केली आणि म्हणाले, 'टेक ओके'. आहे की नाही मजेशीर गोष्ट ? तो प्रदीर्घ इंटरव्ह्यू एका इंग्रजी सिने मासिकात छापून आला होता.

शंकर-जयकिशन यांचं म्युझिक माझा वीक-पॉईंट आहे. माझ्याकडे एस-जे च्या सर्व गाण्यांचं कलेक्शन आहे. खूपशी गाणी मधल्या म्युझिक सहित माहिती आहेत. दोघेही आपापल्या परीने ग्रेट कंपोझर होते. त्यांनी ७५% च्या वर गाण्यांच्या चाली आधी तयार केल्या आहेत आणि मग शब्द लिहिले गेलेत. बॅकग्राऊंड म्युझिक देताना पुढच्या येणाऱ्या पिक्चरच्या गाण्याच्या ट्यून्स ते वापरत.

शंकरजी जास्त करून डान्स सिक्वेन्स साँग्ज, क्लासिकल गाणी द्यायचे. शैलेंद्र यांनी लिहिलेली बहुतेक गाणी त्यांनी कंपोज केली आहे. त्यांना कुठलंही वाद्य वाजवता यायचं. ८० टक्के टायटल साँग्ज त्यांनी कंपोज केली आहेत. जयकिशन आणि हसरत जयपुरी यांचं कॉम्बिनेशन अफलातून होतं. हलकी फुलकी आणि लव साँग्ज जयकिशन यांची खासियत होती. बॅकग्राऊंड म्युझिकमध्ये जयकिशन बाप माणूस होता. माझे स्नेही संगीतकार श्रीकांत ठाकरे माझी ओळख करून देताना 'शंकर-जयकिशन भिडे' अशी करून देत. माझ्या मित्रमंडळींमध्ये मी 'शंकर-जयकिशन-भिडे' म्हणून प्रसिद्ध आहे. हा लेख वाचल्यावर तुम्ही सुद्धा एसजे ची गाणी ऐकल्यावर नक्कीच माझी आठवण काढाल. एसजेबद्दल आणि त्यांच्या संगिताबद्दल मला एवढी माहिती आहे की त्यावर एक पुस्तक लिहिता येईल. एकदा शंकरजींना गमतीने म्हटलं, जब लोग एसजे के गाने सुनते है तो वो आपको नही मुझे याद करते है और जब भी मिलते है तो कहते है चंदू क्या म्युझिक दिया है और हाथ मिलाते है' तेव्हा शंकरजी म्हणाले, 'चंदुभाई ये कमाल की बात है, ये बराबर नहीं हम म्युझिक देते है और क्रेडिट आपको देते है। चंदुभाई इसके बाद अभी हम भी जब हमारे गाने सुनेंगे तो आपको याद करेंगे आणि हातावर टाळी देऊन दिलखुलास हसले. अशा या महान संगीतकारांशी माझे मित्रत्वाचे संबंध होते याचा मला अभिमान आहे.

'जाने वाले कभी नहीं आते, जाने वाले की याद आती है'

## अभिनंदन !

* माणिक निर्मित मराठी गायनाच्या 'राजा आणि राणी' ह्या स्पर्धेसाठी एकूण ७०३ स्पर्धकांमधून १० स्पर्धकांची निवड झाली, त्या १० स्पर्धकांमधून ३ सर्वोत्कृष्ट स्पर्धकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये **सौ. प्राजक्ता भिडे,** सातारा ह्यांची द्वितीय क्रमांकाने निवड करण्यात आली. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे सौ. प्राजक्ता यांना हार्दिक शुभेच्छा ! सौ. प्राजक्ता ह्या श्री. माधव भिडे, सातारा यांच्या स्नुषा आहेत.
* सातारा येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिवगान स्पर्धेमध्ये सामगंध, पनवेल संघाला वृंद गायनात प्रथम क्रमांक मिळाला. सुप्रसिद्ध गायक **श्री. मंदार (अनिरुद्ध) भिडे,** पनवेल आणि त्यांच्या संघाचे भिडे प्रतिष्ठानकडून हार्दिक अभिनंदन !
* लंडन कॉलेज ऑफ टिचर्स ह्या संस्थेचा पाच दिवसांचा आंतरराष्ट्रीय समुपदेशन अभ्यासक्रम **योगिनी भिडे** यांनी यशस्वीरित्या पूर्ण कला. त्यासाठी भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा !

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

श्री. प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. शीला प्रदीप भिडे, नवी दिल्ली पुरस्कृत शालेय अथवा महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विनापरतफेड विशेष आर्थिक मदत देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) | कु. चैताली संजय भिडे, सांगली | रु. २०,००० |
| २) | कु. आस्था केदार भिडे, पुणे | रु. १५,००० |
| ३) | कु. क्षितिजा ग. भिडे, पुणे | रु. २५,००० |
| ४) | कु. प्रणिती अमित फाटक पुणे | रु. ०५,००० |
| ५) | कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली | रु. ०५,००० |
| ६) | कु. अश्विनी अशोक भिडे, पुदुर, कर्नाटक | रु. २०,००० |
| ७) | कु. भाग्यश्री मंदार भिडे, डोंबिवली | रु. ०८,००० |
| ८) | कु. नियती मंदार भिडे, डोंबिवली | रु. ०८,००० |
| ९) | कु. मंजिरी मंदार भिडे, डोंबिवली | रु. ०८,००० |

**वैद्यकीय मदत :** श्री. शरद नारायण भिडे, पुणे यांचे चिरंजीव श्री. संदीप ह्यांचे वैद्यकीय उपचारासाठी भिडे प्रतिष्ठानकडून रु. १०,००० आर्थिक मदत देण्यात आली.

**शैक्षणिक मदत :** चि. अथर्व सुनिल भिडे, पुणे रु. १०,००० आणि चि. कपिल गणेश भिडे, पुणे रु. ५,००० ह्या विद्यार्थ्यांना भिडे प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधीतून आर्थिक मदत देण्यात आली.

**पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे, १४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

सायंदैनिक प्राजक्त

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 0231-2540427**
**email -** prajaktaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS**